


एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

• पुणे, बुधवार २७ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३४०, पाने-८, किंमत : ₹ ६ NAVAKAL


• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 Vol.- 4, Issue - 340, Marathi - Daily - Pune, 27 August, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com





## भारतावर आजपासून ५० टक्के कर लागू अमेरिकेची अधिसूचना! ट्रम्पचा झटका




**अमेरिकन सरकारने भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर आधीच्या २५ टक्क्यावर वाढीव २५ टक्के कर लादण्याची अधिकृत अधिसूचना आज जारी केली. भारत रशियाकडून तेलखरेदी थांबवत नसल्याने अमेरिकेने हा जादा कर लावण्याची धमकी दिली होती. उद्या २७ ऑगस्ट रोजी सकाळी भारतीय वेळेनुसार ९.३१ वाजल्यापासून हा एकूण ५० टक्के कर लागू होईल. या भरमसाठ करामुळे भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या वस्तू अमेरिकेत महागणार आहेत. याचा जबर फटका भारतीय अर्थव्यवस्थेला बसणार आहे. त्यामुळेच पंतप्रधान मोदी यांनी आज अहमदाबाद येथे मारुती-सुझुकीच्या ई विटारा या नव्या मोटारीला हिरवा झेंडा दाखवत इलेक्ट्रिक मोटारी आणि बॅटरी उत्पादनाच्या प्रकल्पाचे उद्घाटन करताना स्वदेशी धोरणाचा पुनरुच्चार केला. मात्र मारूती कंपनी भारतात उत्पादन करणार असली तरी ती जपानी कंपनी आहे.**

■ वॉशिंग्टन

**डोनाल्ड** ट्रम्प दुसऱ्यांदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाल्यापासून स्वदेशीला प्रोत्साहन देण्यासाठी जगभरातील देशांतून आयात होणाऱ्या वस्तूंवर कर लावण्यास सुरुवात केली आहे. जगातील अनेक देश अमेरिकन वस्तूंवर अवाच्या सव्वा कर आकारतात. याउलट अमेरिका या देशांच्या वस्तूंवर खूप कमी कर लावते. त्यामुळे अमेरिकेचे मोठे आर्थिक नुकसान होते, असे ट्रम्प यांचे म्हणणे आहे. यासाठीच अमेरिकेशी व्यापार करणाऱ्या सगळ्या देशांवर जशास तसे कर लावण्याचे धोरण त्यांनी सुरू केले आहे. ३ एप्रिल रोजी त्यांनी एक पत्रकार परिषद घेऊन विविध देशांवर लावलेल्या करांची यादी घोषित केली. त्यात भारतावर त्यांनी २७ टक्के कर लावला होता. पान ७ वर

### मेक इन इंडिया! मेक फॉर द वर्ल्ड

पंतप्रधान मोदी यांनी आज मारुतीची ई विटारा ही ईलेक्ट्रिक कार आणि अहमदाबादमधील जपानी मालकीच्या मारुती-सुझुकीच्या हन्सलपूरस्थित प्रकल्पातील हायब्रिड बॅटरी इलेक्ट्रोडच्या स्थानिक उत्पादन विभागाचे उद्घाटन केले. इथे मारुती सुझुकीच्या ईलेक्ट्रिक एसयूव्हीचे उत्पादन केले जाणार आहे. ही कार जपान, युरोपसह जगभरातील देशांमध्ये पाठवली जाणार आहे. मोदी म्हणाले की, गणेशोत्सवाच्या उत्साहात भारताच्या मेक इन इंडिया यात्रेत एक नवीन अध्याय जोडला जात आहे. 'मेक इन इंडिया, मेक फॉर द वर्ल्ड' हे आमच्या ध्येयाच्या दिशेने हे एक मोठे पाऊल आहे. आजपासून भारतात बनवलेली मारूतीची इलेक्ट्रिक वाहने १०० देशांत निर्यात केली जातील. जगातील अनेक देशांत चालणाऱ्या ईलेक्ट्रिक वाहनांवर मेक इन इंडिया लिहिलेले असेल.

## आझाद मैदानात परवानगी नाही खारघरचा पर्याय! मात्र जरांगे ठाम

**मराठा आरक्षण आंदोलक नेते मनोज जरांगे-पाटील हे मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईत आंदोलन करणार आहेत. ते उद्या सकाळी १० वाजता आंतरवाली सराटी येथून मुंबईकडे रवाना होणार आहेत. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाने त्यांना आझाद मैदानात आंदोलन करण्यास परवानगी नाकारली आहे. त्यांना नवी मुंबईतील खारघर किंवा अन्य ठिकाणी जागा उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश राज्य सरकारला दिले आहेत. यामुळे जरांगे-पाटील यांची कोंडी झाली असली तरी ते मुंबईतील आंदोलनावर ठाम आहेत.**



■ जालना

**मुंबईतील** आझाद मैदानात मोठ्या प्रमाणावर आंदोलक जमल्यास जनजीवन विस्कळीत होईल. त्यामुळे आझाद मैदानामध्ये उपोषण आंदोलन करण्यास मनाई करावी, अशी जनहित याचिका एएमआय फाऊंडेशनचे अनिलकुमार मिश्रा यांनी वकील महेंद्र रत्न यांच्यामार्फत केली होती. या याचिकेवर आज मुख्य न्या. आलोक आराधे व न्या. संदीप मारणे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

राज्य सरकारतर्फे महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ व मुख्य सरकारी वकील पूर्णिमा कंथारीया यांनी युक्तिवाद केला की, उद्यापासून गणेशोत्सव सुरू होत आहे. मुंबईत सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होत असल्याने आधीच मोठी गर्दी असते. या परिस्थितीत मनोज जरांगे-पाटील यांनी मुंबईत येऊन आझाद मैदान येथे आंदोलन केले तर प्रशासनावर प्रचंड ताण येईल. आंदोलनासाठी त्यांना नवी मुंबईतील विशिष्ट जागा निश्चित करून दिली जाऊ शकते. शिवाय आझाद मैदानातील कोणत्याही आंदोलनाच्या बाबतीत कमाल ५ हजार लोकांच्या जमावासह अनेक अटी घालणारी अंतिम नियमावली राज्य सरकारने यापूर्वीच उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे जारी केलेली आहे. ती नियमावली आजच अधिसूचित केली जाईल.

न्यायालयाच्या या आदेशावर मनोज जरांगे म्हणाले की, लोकशाहीच्या मार्गाने आंदोलन करण्याचा आम्हाला हक्क आहे. परवानगी नाकारणे हे लोकशाहीच्या पान ७ वर

### गुरुवारचा अंक नाही

बुधवार २७ ऑगस्ट रोजी गणेश चतुर्थीनिमित्त दै. 'नवाकाळ' कार्यालयाला सुट्टी असल्याने गुरुवार २८ ऑगस्ट रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

**व्यवस्थापक,**
**दै 'नवाकाळ'**

## वरळी बीडीडीतील घराची विक्री सोशल मीडियावर संतापाची लाट

■ मुंबई

**बीडीडी** चाळ पुनर्विकास प्रकल्पांतर्गत वरळी बीडीडी चाळीतील दोन पुनर्वसित इमारतींमध्ये ५५६ रहिवाशांना नुकतीच नवीन घरे देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १४ ऑगस्ट रोजी प्रातिनिधिक १६ रहिवाशांना चावी देण्यात आली होती. त्यानंतर काही दिवसांतच सर्वांना घरांचा ताबाही देण्यात आला. मात्र आता या घरांपैकी एक घर विक्रीस काढल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने संतापाची लाट उसळली आहे.

एका रिअल इस्टेट एजंटने शेअर केलेल्या पोस्टनुसार, वरळीत नव्याने उभारलेल्या बीडीडी इमारतीतील सर्वात वरच्या मजल्यावरील घर २ कोटी ८० लाख रुपयांना विक्रीस काढण्यात आले आहे. हे घर ५०० स्क्वेअर फूट एरियाचे असून, त्यात लिफ्ट आणि एक कार पार्किंगची सोय असल्याचेही नमूद केले आहे. विशेष म्हणजे, मुख्यमंत्री फडणवीस यांनी चावी प्रदान सोहळ्यात हे सोन्यासारखे घर विकू नका, पुढील पिढीला वारसा म्हणून जतन करा असे स्पष्ट आवाहन केले होते. मात्र या आवाहनाकडे दुर्लक्ष करत काही रहिवासी घर विक्रीस काढत असल्याचे दिसत आहे. हा व्हिडिओ व्हायरल होताच नेटकरी संतापले आहेत. आमचा मराठी माणूस ही रूम विकून मुंबईच्या बाहेर जाणार! असे नका करू! मुंबईला परक्यांच्या ताब्यात नका देऊ! अशा अनेक प्रतिक्रिया सोशल मीडियावर व्यक्त होत आहेत.

## दोन स्वदेशी युद्धनौका नौदलाच्या ताफ्यात दाखल

■ विशाखापट्टणम

**आयएनएस** उदयगिरी आणि आयएनएस हिमगिरी या दोन स्वदेशी युद्धनौका आज भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल झाल्या. शत्रुच्या रडारवर येणार नाहीत, अशा पद्धतीने या युद्धनौकांची बांधणी करण्यात आली आहे.

विशाखापट्टणम येथील नौदल तळावर या युद्धनौकांचे जलावतरण पार पडले. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. मुंबईच्या माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड या युद्ध बांधणी कंपनीने उदयगिरी युद्धनौका तयार केली आहे. यासाठी ३७ महिन्यांचा कालावधी लागला. आंध्र प्रदेशातील उदयगिरी पर्वतरांगांवरून हे नाव देण्यात आले. कोलकात्याच्या गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनिअर्सने हिमगिरी युद्धनौकेची बांधणी केली. दोन्ही युद्धनौका जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्र प्रणालीने युक्त आहेत.

## मुंबई पालिका निवडणूक सपा स्वबळावर लढवणार

■ मुंबई

मुंबई महापालिकेची आगामी निवडणूक समाजवादी पक्ष (सपा) स्वबळावर लढवणार आहे. तब्बल दीडशे जागा लढवणार असल्याचे सपाचे मुंबई अध्यक्ष अ‍ॅड. युसूफ अब्राहनी यांनी सांगितले. पक्षाकडून वेगवेगळे सर्व्हे केले जात आहेत. यामध्ये ८० हून अधिक जागांवर पक्षाला चांगला प्रतिसाद आहे. ५० जागांवर विजय मिळू शकतो, असा दावाही त्यांनी केला.

सपाचे आमदार अबू आझमी यांनी सांगितले, की अब्राहनी यांच्या नेतृत्वात मुंबईत पक्ष नव्याने कात टाकत आहे. मुस्लिमांसोबतच ओबीसी समाजातूनही पाठबळ मिळत आहे. काँग्रेसच्या पारंपरिक व्होटबँकेला धक्का बसणार आहे. सपा नेत्यांनी कोणत्याही निवडणूकपूर्व युतीची शक्यता फेटाळून लावत 'एकला चलो रे'चा नारा दिला.

गेल्या महिन्यात आम आदमी पक्षाच्या मुंबईतील नेत्यांनीही महापालिकेच्या सर्व २२७ जागा लढवण्याची घोषणा केली. पुढील वर्षाच्या सुरुवातीला महापालिका निवडणुकीचे बिगूल वाजण्याची शक्यता आहे. भाजपा, काँग्रेस, दोन्ही शिवसेना आणि दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस हे पक्ष महायुती आणि महाविकास आघाडी म्हणून निवडणूक लढवणार की कसे याबद्दल अजून संभ्रम आहे.

## जय जवान पथकाने राज ठाकरेंची भेट घेतली

■ मुंबई

यंदाच्या दहीहंडी उत्सवात जय जवान गोविंदा पथकाने १० थरांची हंडी फोडण्याची हॅट्ट्रिक करून नवीन विक्रम नोंदवला. या पथकाने आज मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी राज यांनी अर्धा तास पथकातील खेळाडूंशी संवाद साधत कोण कितव्या थरावर असतो, याची विचारपूस केली. काही खेळाडूंनी त्यांच्या सह्यांची मागणी केली असता, राज ठाकरेंनी शुभेच्छा संदेशासह सही दिली. जय जवान पथकातील ४१ खेळाडू ऑक्टोबर २०२६ मध्ये स्पेन दौऱ्यावर जाणार आहेत आणि या दौऱ्याचा संपूर्ण खर्च मनसे उचलणार असल्याची माहिती मनसे नेते अविनाश जाधव यांनी दिली.

## शासकीय कागदपत्रे आता व्हॉट्सअ‍ॅपवरही मिळणार

■ मुंबई

**सर्व** प्रकारच्या सरकारी सेवांची कागदपत्रे आता आपले सरकार या शासकीय पोर्टलच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहेत. राज्य शासनाच्या निर्णयामुळे शासकीय कार्यालये, सेतू आदींना खेटे घालण्यापासून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच सर्व सेवा योग्य प्रकारे आणि गरजेनुसार पुरवण्याच्या दृष्टीने सर्व तालुक्यांत गावांची एक-एक साखळी तयार करावी, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले.

राज्य सरकारच्या 'सेवा सुलभीकरण' धोरणांतर्गत नागरिक सेवांसंदर्भात मुख्यमंत्र्यांना आढावा बैठक घेतली. यावेळी बृहन्मुंबई महापालिकेच्या एकाच प्रकारच्या नऊ सेवा एकत्र करण्याचे आदेश त्यांनी दिले. तसेच सेवा पुरवठ्याच्या गुणवत्तेची खात्री करण्यासाठी त्रयस्थ संस्थेमार्फत नियमित पडताळणी करावी, अर्ज प्रक्रियेत लागणारी कागदपत्रांची संख्या लक्षणीयरित्या कमी करण्यासाठी नियोजन करण्याचेही आदेश त्यांनी दिले.

## भंडारा पालकमंत्रिपदी पंकज भोयर फडणवीसांचा मंत्री सावकारेंना धक्का

■ भंडारा

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांनी विदर्भातील भंडारा जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावरून वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे यांची उचलबांगडी केली. गृह राज्यमंत्री पंकज भोयर हे आता भंडाऱ्याचे नवे पालकमंत्री असतील. कॅबिनेट मंत्री असलेल्या सावकारेंना आता बुलडाणा जिल्ह्याचा सहपालकमंत्री करण्यात आले आहे. काल रात्री उशिरा राज्य सरकारने यासंदर्भातला



शासनादेश काढला.

सावकारे यांच्या कार्यपद्धतीविषयी स्थानिक नागरिकांमध्ये असलेली तीव्र नाराजी हे या फेरबदलामागील प्रमुख कारण असल्याचे सांगितले जात आहे. जळगाव जिल्ह्यातले सावकारे हे केवळ १५ ऑगस्ट, २६ जानेवारी आणि जिल्हा नियोजन समितीच्या बैठकांपुरताच भंडारा जिल्ह्यात हजेरी लावत असल्याची तक्रार सातत्याने येत होती. त्यामुळे स्थानिक प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत होती. जिल्ह्यात शिंदे गटाचे आ. नरेंद्र भोंडेकर यांचा स्थानिक पातळीवर प्रभाव वाढू लागला होता. या पार्श्वभूमीवर भाजपाच्या संघटनात्मक ताकदीस बळकटी देण्यासाठी विदर्भातीलच वर्धा जिल्ह्यातील पंकज भोयरांना भंडाऱ्याचे पालकमंत्री करण्यात आले आहे.

## एमपीएससीने पहिल्यांदाच तब्बल बारा प्रश्न रद्द केले

■ नागपूर

**महाराष्ट्र** लोकसेवा आयोगाच्या ढिसाळ नियोजनाचा आणखी एक नमुना समोर आला आहे. आयोगाने गट-ब (अराजपत्रित) सेवा, संयुक्त (मुख्य) परीक्षा-२०२४ ची अंतिम उत्तरतालिका जाहीर करताना तब्बल १२ प्रश्न रद्द केले आहेत, तर दोन प्रश्नांचे पर्याय बदलले आहेत. एकूण १४ प्रश्नांमध्ये झालेल्या बदलांमुळे विद्यार्थ्यांच्या निकालावर मोठा परिणाम होणार असून, राज्यातील हजारो उमेदवार चिंतेत सापडले आहेत.

२९ जून २०२५ रोजी ही परीक्षा झाली होती. प्रथम उत्तरतालिकेवर विद्यार्थ्यांनी नोंदवलेल्या हरकती व तज्ज्ञांचे अभिप्राय लक्षात घेऊन आयोगाने अंतिम उत्तरतालिका निश्चित केली. मात्र आता या उत्तरतालिकेविषयी कोणतेही निवेदन किंवा पत्रव्यवहार स्वीकारला जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले. इतक्या मोठ्या प्रमाणावर प्रश्न रद्द होण्याची पान ७ वर

## वैष्णोदेवी मार्गावर भूस्खलन! ५ ठार डोडामध्ये ढगफुटी! ४ जणांचा मृत्यू

■ श्रीनगर

**जम्मू** आणि काश्मीरमधील वैष्णोदेवी यात्रा मार्गावर अर्धकुमारीजवळ आज भूस्खलन झाले. या दुर्घटनेत ५ जणांचा मृत्यू झाला आहे. तर १४ जण जखमी झाले आहेत. तर डोडा जिल्ह्यात आज पहाटे झालेल्या ढगफुटीमुळे अचानक पूर आला. या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाला तर अनेक घरांचे नुकसान झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, मागील २४ तासांत जम्मूमध्ये १९०.४ पान ७ वर



## भाजपात जाताच थोपटेंना मदत साखर कारखान्याच्या कर्जाला हमी

■ मुंबई

**भाजपामध्ये** प्रवेश केलेल्या माजी आमदार संग्राम थोपटे यांना राज्य सरकारकडून लगेचच मोठी मदत करण्यात आली आहे. त्यांच्या राजगड सहकारी साखर कारखान्याच्या खेळत्या भांडवलाच्या कर्जाला मंत्रिमंडळाने हमी देण्याचा निर्णय आज घेतला. राजगड साखर कारखाना गेल्या अनेक दिवसांपासून अडचणीत होता. वेतन थकले असल्याने कामगारही चिंतेत होते. या पार्श्वभूमीवर आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हमीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. दरम्यान, माजी मंत्री बबन ढाकणे यांच्या केदारेश्वर सहकारी साखर कारखान्यास देखील महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून मुदती कर्ज शासन हमीवर उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

थोपटे यांचे कुटुंब पारंपरिकरित्या काँग्रेसशी निष्ठावान होते. मात्र काही महिन्यांपूर्वी संग्राम थोपटे यांनी भाजपात प्रवेश केला. त्यावेळी त्यांनी हा कारखाना वाचवण्यासाठीच पक्षांतर केले, अशी चर्चा होती.

## २७ ऑगस्टपासून महाबळेश्वरला रिपब्लिकन पक्षाचे विचारमंथन शिबिर

■ मुंबई

**महामानव** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या खुल्या पत्रावर आधारित व्यापक रिपब्लिकन पक्ष साकार करण्यासाठी तसेच बदलत्या काळात रिपब्लिकन पक्षाची वाटचाल मजबूत करण्यासाठी साहित्यिक आणि विचारवंतांशी विचार मंथन करून पुढील वाटचालीचे दिशादर्शन करण्यासाठी येत्या २७ आणि २८ ऑगस्ट रोजी महाबळेश्वरमध्ये रिपब्लिकन पक्षाचे विचारमंथन शिबिर आयोजित करण्यात आल्याची माहिती रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज दिली.

बुधवारी सायंकाळी ५ वाजता महाबळेश्वर येथील ऐश्वर्या इन हॉटेलच्या सभागृहात रिपब्लिकन पक्षाच्या या विचारमंथन शिबिराला सुरुवात होणार आहे. पक्षाचे निवडक कार्यकर्ते आणि राज्यातील अनेक ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत यांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि आर्थिक विषयावर विचारमंथन होणार आहे. या विचारमंथन शिबिरात ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शरण कुमार लिंबाळे, डॉ. अच्युत माने, डॉ. ऋषिकेश कांबळे, अ‍ॅड.दिलीप काकडे, डॉ. प्रा. विजय काळेबाग, प्रा. अमर कांबळे, प्रा. विजय खरे, प्रा. कुमार अनिल, के. वी. सरवदे आदी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# वनताराची चौकशी होणार विशेष तपास पथक स्थापन

■ नवी दिल्ली

**गुजरातच्या** जामनगर येथील उद्योजक अनंत अनिल अंबानी यांच्या मालकीच्या वनतारा वन्यजीव बचाव आणि पुनर्वसन केंद्राची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने ४ सदस्यीय विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले आहे. हे तपास पथक भारत आणि परदेशातून प्राणी आणताना वन्यजीव संरक्षण कायदा आणि आंतरराष्ट्रीय करारांचे पालन झाले का? याची चौकशी करेल, असे न्यायालयाने काल आपल्या आदेशात स्पष्ट केले. न्यायमूर्ती पंकज मित्तल आणि न्यायमूर्ती प्रसन्नकुमार वराळे यांच्या पीठाने एसआयटी स्थापन करण्याचा हा निर्णय दिला. तपास पथकाला न्यायालयाने काही निकषही सांगितले आहेत. तपास पथकाला १२ सप्टेंबरपर्यंत अहवाल सादर करावा लागेल. हे पथक प्राणी कल्याण, आयात-निर्यात कायदे, वन्यजीव तस्करी, पाण्याचा गैरवापर आणि कार्बन क्रेडिट यासारख्या मुद्यांच्या आधारे तपास करावा, असे सांगितले.

# उच्च न्यायालयातील १४ न्यायमूर्तींची एकदम बदली

■ नवी दिल्ली

**सर्वोच्च** न्यायालयाच्या कॉलेजियमने देशभरात कार्यरत असलेल्या उच्च न्यायालयातील १४ न्यायमूर्तींच्या बदलीची एकदम शिफारस केली आहे. यामध्ये नुकतेच राजस्थानहून दिल्ली उच्च न्यायालयात बदली झालेले न्यायमूर्ती अरुण मोंगा यांचाही समावेश आहे. त्यांचे मूळ उच्च न्यायालय पंजाब आणि हरियाणा आहे. महाराष्ट्रातील एकाही न्यायमूर्तींचा मात्र या यादीमध्ये समावेश नाही. मध्य प्रदेश उच्च न्यायालयातील वरिष्ठ न्यायमूर्ती अतुल श्रीधरन यांची छत्तीसगड उच्च न्यायालयात बदली होण्याची शक्यता आहे. याशिवाय न्यायमूर्ती संजय अग्रवाल (छत्तीसगड ते इलाहाबाद), जे. निशा बानू (मद्रास ते केरळ), दिनेश मेहता, अवनीश झिंगन (राजस्थान ते दिल्ली), संजय कुमार सिंह (इलाहाबाद ते मद्रास) अशा अनेक न्यायमूर्तींच्या बदल्यांची शिफारस केली जाणार आहे.

देश विदेश

# सुदानमध्ये गृहयुद्ध सुरूच! उपासमारीमुळे ४६ मृत्यू

■ खार्टूम



**गेल्या** दोन महिन्यांत उपासमारीमुळे सुदानच्या दक्षिण कॉर्डोफान राज्यात ४६ लोकांचा मृत्यू झाला. यामध्ये बहुतेक लहान मुलांचा आणि महिलांचा समावेश आहे. सुदानमध्ये एप्रिल २०२३ पासून गृहयुद्ध सुरू असून सुदानचे सशस्त्र दल आणि रॅपिड सपोर्ट फोर्सेस या दोन गटांमध्ये हा संघर्ष सुरू आहे.

या संघर्षात अनेक कुटुंबे अडकली आहेत. त्यांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली. गर्भवती महिलांवर आणि लहान मुलांवर याचा सर्वाधिक परिणाम होत आहे. सुदानमध्ये अन्नाची गरज असल्याचे मानवाधिकार संघटनांनी म्हटले आहे. शिवाय वैद्यकीय सुविधांचीही मदत अपुरी पडत आहे.

कुपोषणामुळे नवजात बालकांचा मृत्यू होत आहे, तर जन्मलेल्या बाळांना पोषक अन्न मिळणे कठीण झाले आहे. सुदानच्या डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार देशाचे लष्कर उपासमारीचा रणनीती म्हणून वापर करत आहेत. त्याला डॉक्टरांनी तीव्र विरोध केला. याला मानवतेविरुद्धचा गुन्हा आणि आंतरराष्ट्रीय मानवी कायद्यांचे उल्लंघन मानले आहे.

# आयल ऑफ वाइटमध्ये हेलिकॉप्टर कोसळले

■ लंडन

### ३ जणांचा मृत्यू

**युकेतील** आयल ऑफ वाइट येथे शँकलिनजवळ शेतात सकाळी हेलिकॉप्टर कोसळल्यामुळे तीन जणांचा मृत्यू झाला. तर एक जण गंभीर जखमी झाला. या घटनेच्या चौकशीला पोलिसांनी सुरूवात केली असली तरी कोणतेही ठोस कारण समोर आले नाही. हेलिकॉप्टरने सँडाउन विमानतळावरून उड्डाण केले होते. ते ८०० फूट उंचीवर गेले असताना अचानक शेतात कोसळले. या हेलिकॉप्टरमध्ये पायलटसह तीन जण होते. या घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाचे जवान आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले. मात्र तोपर्यंत तीन जणांचा जागीच मृत्यू झाला होता. तर गंभीर जखमी झालेल्या एकाला साउथहॅम्प्टन येथील मेजर ट्रॉमा सेंटरमध्ये एअरलिफ्ट करण्यात आले.

# रोहिंग्या मुस्लिमांना न्याय द्या मोहम्मद युनूस यांची मागणी

■ कॉक्सबाजार

**नोबेल** शांतता पारितोषिक विजेते आणि बांगलादेशचे हंगामी सल्लागार मोहम्मद युनूस यांनी रोहिंग्या मुस्लिमांच्या सुरक्षित व सन्मानपूर्वक मायदेशी परतीसाठी जागतिक समुदायाने ठोस उपाययोजना तयार करावी, अशी मागणी केली आहे.

बांगलादेश आता १५ लाख रोहिंग्या शरणार्थींचे ओझे उचलू शकत नसल्याचे स्पष्ट सांगितले. कॉक्सबाजार येथे म्यानमारच्या रखाइन राज्यातून रोहिंग्या मुस्लिमांच्या हकालपट्टीला आठ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित दोन दिवसीय परिषदेत युनूस बोलत होते. यावेळी त्यांनी सात कलमी योजना सादर केली.

मोहम्मद युनूस म्हणाले की, रोहिंग्या समाजाच्या सुरक्षित परतीशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. त्यांचा त्यांच्या मायदेशी परतण्याचा हक्क मिळणे आवश्यक आहे. आता कृतीची वेळ आली आहे.बांगलादेश आता १५ लाख रोहिंग्या शरणार्थींचे ओझे उचलू शकत नाही. आता त्यांच्यासाठी निधी कमी पडत आहे. मात्र मानवतेच्या दृष्टिकोनातून हा कार्यक्रम थांबवता येणार नाही.

# गोव्यात पीओपी गणेशमूर्ती दुकानांना थेट टाळे लावले

■ पणजी



### प्रदूषण नियंत्रण मंडळाची कारवाई

**गोव्यामध्ये** पीओपीच्या म्हणजेच प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मूर्तींवर बंदी आहे. तरीही काही ठिकाणी पीओपीच्या गणेशमूर्ती विकल्या जात होत्या. आता अशा मूर्तींची विक्री करणाऱ्या दुकानांवर राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने कारवाई सुरू केली आहे. या दुकानांना मंडळाने थेट टाळे लावले.

राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव संजीव जोगळेकर यांनी सांगितले की, गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने २१ ऑगस्टपर्यंत एकूण २०७ नमुने गोळा केले. त्यापैकी १६० नमुन्यांचे परीक्षण केले. यातील २४ नमुन्यांमध्ये १० टक्केपेक्षा जास्त कॅल्शियम सल्फेट आढळले. त्यामुळे अशा दुकानांना टाळे ठोकण्यात आले. नैसर्गिक मातीच्या मूर्तींमध्ये केवळ ०.६ टक्के ते ३.०६८ टक्के पीओपी आढळतो, मात्र काही मूर्तींमध्ये त्यापेक्षा खूपच जास्त असल्याने नियमांचे उल्लंघन झाले होते.

या संदर्भात मंडळाने पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ च्या कलम ५ अंतर्गत अधिकाऱ्यांना कडक कारवाई करण्याचे निर्देश जारी केले होते. ही नोटीस अबकारी आयुक्त, वाहतूक संचालक, पोलीस महासंचालक, राज्य कर आयुक्त, दक्षिण व उत्तर गोवा जिल्हाधिकारी, नगर प्रशासन संचालक, पंचायत संचालक तसेच उद्योग, वाणिज्य व व्यापार संचालनालय यांना पाठवण्यात आली आहे. सर्व विभागांना आवश्यक ती पावले उचलण्याचे आदेश दिले आहेत.

# चैत्यभूमी आणि सावरकर स्मारक राज्यपाल राधाकृष्णन यांनी अभिवादन केले

■ मुंबई

**उपराष्ट्रपती** पदाची उमेदवारी जाहीर झालेल्या राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा जयजयकार केला.



त्यानंतर राज्यपालांनी चैत्यभूमी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला भेट देऊन राज्यघटनेच्या शिल्पकारांना पुष्पहार करुन अभिवादन केले. यावेळी भंतेंनी प्रार्थना केली. राज्यपालांनी स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक येथे जाऊन वीर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार व आमदार अमित साटम यांनी राज्यपालांचे स्वागत केले.

# पनवेल रेल्वे स्थानकावर बसचा ब्रेक निकामी

■ नवी मुंबई

**नवी** मुंबईतील पनवेल रेल्वे स्थानक परिसरात एका बसचा ब्रेक निकामी झाला. एनएमएमटीची ७३ क्रमांकाची बस कल्याण येथून पनवेलकडे येत असताना स्थानक परिसरात पोहोचली. यावेळी अचानक तिचा ब्रेक निकामी झाल्याचे चालकाच्या लक्षात आले. चालकाने तातडीने बसचे स्टेअरिंग बाजूला वळवून ती थेट रेल्वे स्थानकाच्या संरक्षण भिंतीवर धडकवली. या धडकेत भिंतीचे आणि बसच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले. मात्र, अनेक प्रवाशांचे प्राण वाचले.

# महामार्गाच्या कामात दिरंगाई! फौजदारी गुन्हा दाखल करणार

■ सातारा

### मंत्री देसाईंचा इशारा

**राष्ट्रीय** महामार्ग प्राधिकरणाकडील सातारा-कोल्हापूर रस्त्याचे काम गेल्या तीन वर्षांपासून सुरू आहे. तर कराड-चिपळूण मार्गाचे काम तब्बल चार वर्षांहून अधिक काळ रखडलेले आहे. या दोन्ही महामार्गांचे काम मुदतीत पूर्ण न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा इशारा साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिला आहे.

येथील पालकमंत्री कार्यालयात या महामार्गाच्या कामाचा देसाईंनी आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसोबतच सर्व संबंधित अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी देसाई म्हणाले, की सातारा-कोल्हापूर महामार्गाचे काम २६ मार्च २०२६ पर्यंत व कराड-चिपळूण मार्गाचे काम डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करा. या कामांना गती देणे अत्यावश्यक आहे. संथगतीमुळे नागरिकांना प्रचंड गैरसोय सहन करावी लागत आहे. कराड येथील उड्डाणपुलाच्या एका बाजूचे काम ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करून ती बाजू वाहतुकीसाठी सुरू करा.

# दुचाकी शोरूमला आग पुण्यात ६० दुचाकी खाक

■ पुणे

**पुण्यात** बंडगार्डन रस्त्यावरील ताराबाग भागातील तीन मजली इमारतीच्या तळमजल्यावर असलेल्या टीव्हीएस कंपनीच्या दुचाकी शोरूम व सर्व्हिस सेंटरला काल रात्री उशिरा भीषण आग लागली. या आगीत सुमारे ६० दुचाकी जळून खाक झाल्याची माहिती आहे. आग लागल्याची माहिती मिळताच नायडू व येरवडा अग्निशमन केंद्रातील बंब आणि मुख्यालयातील वॉटर टँकर घटनास्थळी दाखल झाले.तीन मजली इमारतीच्या तळमजल्यावर आग पसरली होती. धुरामुळे अडकलेल्या एका व्यक्तीला सुखरूप बाहेर काढले. अग्निशमन दलाने ३० मिनिटांत आग आटोक्यात आणली. आगीत दुचाकींसह वायरिंग, बॅटऱ्या, संगणक, फर्निचर व कागदपत्रांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

# जयंत पाटलांमध्ये हिंमत असेल तर आमदारकीचा राजीनामा द्यावा

■ सांगली

### गोपीचंद पडळकरांचे आव्हान

**राष्ट्रवादीचे** (शरद पवार गट) आमदार जयंत पाटील हिंदूविरोधी आहेत. त्यांच्यात खरोखरच हिंमत असेल, तर त्यांनी आमदारकीचा राजीनामा द्यावा आणि इस्लामपूर मतदारसंघातून पुन्हा निवडणूक लढवावी. मी स्वतः त्यांच्या विरोधात निवडणूक लढवायला तयार आहे, असे खुले आव्हान भाजपाचे नेते आमदार गोपीचंद पडळकर यांनी जयंत पाटील यांना दिले आहे. जयंत पाटील आमदारकीचा राजीनामा देणार नाहीत आणि निवडणूकदेखील लढवणार नाहीत, कारण त्यासाठी हिंमत लागते, असेही ते म्हणाले. काही दिवसांपूर्वी जयंत पाटील यांनी काहीजण स्वतःच्या गावात नाही तर दुसऱ्या भागातून ४० ते ५० हजार मतांनी निवडून येतात हे शंकास्पद आहे. त्यामुळे हे निवडणुकांचे निकाल खरे आहेत का? असा प्रश्न उपस्थित होत आहे, असे म्हणत पडळकरांवर निशाणा साधला होता, याला प्रत्युत्तर म्हणून पडळकरांनी आता जयंत पाटील यांना आव्हान दिले आहे. पडळकर म्हणाले की, समाजात आजही मुघल प्रवृत्तीचे लोक आहेत. आपण त्यांना ठेचून काढायचे आहे. एकीकडे सर्वधर्मसमभाव म्हणायचे आणि हिंदूंचे जबरदस्तीने धर्मांतर करायचे. हिंदूंवर अन्याय होत असेल तर मी त्याविरोधात नेहमीच आक्रमक भूमिका घेणार.

महाराष्ट्र राज्य लॉटरी
महाराष्ट्र गजलक्ष्मी साप्ताहिक सोडत
सोडत दर सोमवार ते रविवार
जिंकले जिंकले
जुलै महिन्यात बक्षीसांचा वर्षाव
पहिले बक्षिस ₹ 10000
तिकीट ₹ 20/-
महाराष्ट्र गजलक्ष्मी गुरु
सोडत दि.03/07/2025 विजेता तिकीट क्र: GL-02-5529
रिटेलर आणि स्टॉकिस्ट: हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा
महाराष्ट्र गजलक्ष्मी सोम
सोडत दि.14/07/2025 विजेता तिकीट क्र: GL-03-5726
रिटेलर: कार्तिक लॉटरी सेंटर, दादर
स्टॉकिस्ट: श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर
महाराष्ट्र गजलक्ष्मी शुक्र
सोडत दि.18/07/2025 विजेता तिकीट क्र: GL-03-5379
रिटेलर आणि स्टॉकिस्ट: पवार लॉटरी, ठाणे
महाराष्ट्र गजलक्ष्मी गुरु
सोडत दि.24/07/2025 विजेता तिकीट क्र: GL-03-8988
रिटेलर: जय संतोषी माँ लॉटरी सेंटर, मुलुंड
स्टॉकिस्ट: सुमित एजन्सी, मुंबई
महाराष्ट्र गजलक्ष्मी मंगल
सोडत दि.29/07/2025 विजेता तिकीट क्र: GL-03-4585
रिटेलर आणि स्टॉकिस्ट: हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा
विजेते आणि विक्रेते यांचे हार्दिक अभिनंदन!

महाराष्ट्र राज्य लॉटरी
महाराष्ट्र गणेशलक्ष्मी साप्ताहिक सोडत
सोडत दर सोमवार ते रविवार
जिंकले जिंकले
जुलै महिन्यात बक्षीसांचा वर्षाव
पहिले सामाईक बक्षीस ₹ 10000/-
तिकीट ₹10/-
महाराष्ट्र गणेशलक्ष्मी धन
सोडत दि.04/07/2025 विजेता तिकीट क्र: MG-01-2869
स्टॉकिस्ट: प्रिन्स लॉटरी सेंटर अँन्ड जनरल स्टोर्स, कल्याण
महाराष्ट्र गणेशलक्ष्मी शुभ
सोडत दि.15/07/2025 विजेता तिकीट क्र: MG-08-2025
रिटेलर: सिद्धीविनायक लॉटरी सेंटर, दादर स्टॉकिस्ट: अंबिका एजन्सी, दादर
महाराष्ट्र गणेशलक्ष्मी भाग्यशाली
सोडत दि.28/07/2025 विजेता तिकीट क्र: MG-09-6888
स्टॉकिस्ट: श्री सिद्धी समर्थ एजन्सी, दादर
विजेते आणि विक्रेते यांचे हार्दिक अभिनंदन!


महाराष्ट्र राज्य लॉटरी
महाराष्ट्र सह्याद्री साप्ताहिक सोडत
सोडत दर सोमवार ते रविवार
जिंकले जिंकले
जुलै महिन्यात बक्षीसांचा वर्षाव
पहिले बक्षिस ₹ 10000
तिकीट ₹ 15/-
महाराष्ट्र सह्याद्री राजलक्ष्मी
सोडत दि.18/07/2025 विजेता तिकीट क्र: SR-01-3909
रिटेलर आणि स्टॉकिस्ट:
हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा
विजेते आणि विक्रेते यांचे हार्दिक अभिनंदन!

महाराष्ट्र राज्य लॉटरी
महाराष्ट्र साप्ताहिक सोडत
सोडत दर सोमवार ते शनिवार
MAHARASHTRA WEEKLY LOTTERY
जिंकले जिंकले
जुलै महिन्यात बक्षीसांचा वर्षाव
₹ 16 लाख (₹8 लाखाची x 2 बक्षीसे)
तिकीट ₹ 50/-
पहिले बक्षीस रु. 8 लाख
महाराष्ट्र वैभवलक्ष्मी
सोडत दि.04/07/2025 विजेता तिकीट क्र: VL-06-4993
रिटेलर: जय महाराष्ट्र, अंधेरी
स्टॉकिस्ट: सिद्धी समर्थ एजन्सी, दादर-मुंबई
महाराष्ट्र अक्षय
सोडत दि.09/07/2025 विजेता तिकीट क्र: AK-00-5587
रिटेलर: सिद्धी विनायक, दादर-मुंबई
स्टॉकिस्ट: अंबिका एजन्सी, दादर-मुंबई
पहिले बक्षीस रु. 8 लाख
विजेते आणि विक्रेते यांचे हार्दिक अभिनंदन!




दैनंदिन कार्यक्रमः
श्रींचे आगमन मिरवणूक - दि. २७ ऑगस्टः स. ८.३० वा. मंदिरापासून
श्रींचे दैनंदिन अभिषेक/महापूजाः दि. २८ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर स. ७ ते सायं. ५
गणेशयाग (उत्सव मंडप): शुभारंभ - २७ ऑगस्ट - दु. १ वा.
दि. २८ ते ३१ ऑगस्ट स. ८ ते १२, दु.१२.३०ते ४.३०
सहस्त्राभिषेकम, लक्षार्चना व गणेशयागः दु.१२ ते ४ दि. १ व २ सप्टेंबरः श्रींचे मंदिरात
सामुहिक सूर्य नमस्कारः दि. २९ ऑगस्टः स.६
सामुहिक अग्नीहोत्रः दि. ३० ऑगस्टः स.६
मंत्र जागरः दि. ३ सप्टेंबरः दु. ३ वा.
सत्यविनायक पूजाः दि. ५ सप्टेंबरः दु.४ ते ६
महिला हळदी-कुंकूः दि. ५ सप्टेंबरः सायं.७ ते ८
"श्री गणनायक" रथातून श्रींची भव्य विसर्जन मिरवणूक दि. ६ सप्टेंबर २०२५ - दु. ४ वाजता


जय गणेश
श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे
सर्व गणेशभक्त बंधू-भगिनींना सस्नेह निमंत्रण - गणेशोत्सव २०२५
वर्ष १३३वे
'श्रीं'ची प्राणप्रतिष्ठापना आज बुधवार दि. २७/०८/२०२५ सकाळी ११.११ वा.
प.पू.आदरणीय श्री घनशामाचार्य महाराज, पीठाधिपती श्री रामानुजाचार्य श्री झालरिया, श्री दास हनुमान देवस्थान, चित्रकुट यांच्या शुभहस्ते
देखाव्याच्या विद्युत रोषणाईचे उद्घाटनः "पद्मनाभस्वामी मंदिर, तिरुवंतपूरम" सायं. ७ वाजता
ना.माधुरीताई मिसाळ, राज्यमंत्री, महाराष्ट्र यांच्या शुभहस्ते
ऋषि पंचमीः दि. २८ ऑगस्ट, पहाटे ६ वाजता महिलांचे अथर्वशीर्ष पठण
प्रमुख पाहुणेः मा.खासदार सौ. सुनेत्राताई पवार, मा.रजनीताई किरण क्षिरसागर, धर्मादाय सहआयुक्त, पुणे
हरी जागरः द्वारा समस्त वारकरी बंधू - दि. २८ ऑगस्ट, रात्री १० ते १२
भारतीयांचे श्रध्दास्थान आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या या मंगलमूर्तीचा वैभवशाली उत्सव आज बुधवार दि. २७ ऑगस्ट ते शनिवार दि. ६ सप्टेंबर २०२५ पर्यंत दत्त मंदिर समोरील, बुधवार पेठ येथील पारंपारिक जागेत संपन्न होत आहे. अथर्वशीर्ष आवर्तने, महाभिषेक पूजा, गणेशयाग, हरीजागर, सत्यविनायक असे पवित्र धार्मिक विधी यावेळी संपन्न होणार आहेत. या सोहळ्यात सर्व भाविकांनी सहभागी होऊन हा पवित्र उत्सव आनंदाने पार पाडावयाचा आहे. आपल्या चरणी विनम्र प्रार्थना की आपण 'श्रीं'च्या या पवित्र उत्सव सोहळ्यात सहभागी होवून दर्शन - प्रसादाचा लाभ घ्यावा ही विनंती.


प.पू.श्री घनशामाचार्य महाराज


मा.माधुरीताई मिसाळ


मा.सौ.सुनेत्राताई पवार

वेबसाईट क्युआर कोड
दररोज बाप्पांची आरतीः वेबसाईट YouTube facebook Instagram


पद्मनाभस्वामी मंदिर, तिरुवंतपूरम

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे ■ सुवर्णयुग तरुण मंडळ, पुणे
गणपती भवन, २५०, बुधवार पेठ, पुणे २, फोनः २४४७९२२२ ■ गणपती सदन, १३२, बुधवार पेठ, शैक्षणिक संकुल, पुणे २, फोनः २४४९२०००
E-mail: contact.dhgt@gmail.com jayganesh.dhgt@gmail.com
बाप्पांचे ॲप डाऊनलोड कराः २४ तास बाप्पांचे थेट दर्शन

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

## संपादकीय

# नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# सर्व गुणांचा अधिपती गणपती

**देखा विवेकवंतु सुविमळु। तोचि शुंडादंडु सरळु।**
**एथ परमानंदु केवळु ब्रह्मसुखाचा।**

संत ज्ञानेश्वर माऊलींनी गणरायाचे केलेले वर्णन म्हणजे त्याच्यात होणारं ब्रह्मसुखाचं दर्शन आहे. गणपती ही देवता अशी आहे की जिचे अनेक पद्धतीने वर्णन केले जाते. अथर्वशीर्षामध्ये तिला त्वं ब्रह्मास्त्वं, विष्णूस्त्वं, रुद्रस्त्वं, इंद्रस्त्वं, वायुस्त्वं, अग्नीस्त्वं, सूर्यस्त्वं, चंद्रमास्त्वं ब्रह्मभूर्भवः स्वरोम म्हणजे सगळ्याच सृष्टीचे आदी अनंत रूप गणपती असल्याचे वर्णन केले आहे.

**संत एकनाथांनीसुद्धा एकेचिकाळी सकळ सृष्टी।**
**आपुलेपण देखति उठी।**
**तेचि तुझे देखणे दृष्टी। सुखसंतुष्टी विनायका।**

ओंकाररूप असा सकळ सृष्टीचा अधिष्ठाता तू आहेस. तुझी ही देखणी दृष्टी पाहिल्याबरोबर सगळी सुखसंतुष्ट होतात. म्हणूनच समर्थ रामदासांनीसुद्धा आपल्या प्रसिद्धी आरतीमध्ये सुखकर्ता असे यथार्थ नामाभिधान दिले आहे. सगळ्या सृष्टीचेच अधिष्ठान ठरणाऱ्या गणरायाचे आजचे आगमन म्हणजे सगळ्या गणेशभक्तांसाठी अलौकिक असे आनंदनिधान ठरते. गणरायाला विघ्नविनाशक म्हटले जाते. पण त्याहीपेक्षा तो बुद्धीदाता आहे. ज्ञान विज्ञानमयोसि। अशी त्याची ख्याती सांगितली जाते. आणि जिथे ज्ञान विज्ञान किंवा बुद्धी असते तिथे कोणत्याही प्रकारचे विघ्न टिकण्याची शक्यता राहात नाही. कारण या ज्ञानविज्ञानातूनच सारासार विवेक म्हणजेच काय चांगले काय वाईट किंवा एकूणच जीवन जगण्यासाठी उत्कृष्ट आणि आवश्यक काय आहे याचे तारतम्य आपोआप कळू लागते. आणि अशा ज्ञानविज्ञानाला गणरायाच्या भक्तीचे अधिष्ठान मिळाल्यानंतर विघ्न दूर करण्याचीदेखील सामयिक इच्छाशक्ती किंवा आत्मशक्ती आकाराला येते. भारतीय संस्कृतीमध्ये देवाधिकांच्या पूजाअर्चा किंवा त्यांच्याविषयीची आध्यात्मिक साधना ही सर्वार्थाने जन्माला आलेल्या प्रत्येक मनुष्यासाठी आत्मविकास करून घेण्याची अमूल्य संधी मानली जाते. सर्व प्रकारच्या भक्तीचे हेच मोठे रहस्य असल्याने गणरायाच्या रूपाने या भक्तीला येणारे उधाण तितकेच अलौकिक ठरत असेल तर त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. म्हणूनच गणपती हा सकलगुणांचा अधिपती म्हटला गेला आहे.

### समाज व्यवस्थेची ऊर्जा

संपूर्ण वर्षभरामध्ये अनेकानेक उत्सव साजरे होत असतात त्या त्या पंथांचे त्या त्या देवतांविषयी श्रद्धा, निष्ठा असलेले उत्सव वेगवेगळ्या पद्धतीने साजरे होत राहातात. आपल्या देशामध्ये लाखो भक्तांना एकत्र आणणारे अनेक उत्सव आहेत. महाराष्ट्रात आषाढी एकादशीचा पांडुरंगाचा उत्सव असेल. खंडोबाचे नवरात्र असेल. जगन्नाथपुरीची रथयात्रा असेल. त्या ठिकाणी एकाचवेळी लाखो लोक एकत्र येतात. परंतु समाजातल्या सगळ्या विचारांचे सर्व पंथांचे सर्व जाती संप्रदायाचे लोक सामुहिकपणे एकत्र येणे ज्याची आराधना करतात तो एकमेव उत्सव म्हणजे गणेशोत्सव ठरतो. अनेक गणांचा नायक म्हणून त्याचे वर्णन होत असतेच. तसाच तो समाजातला सर्व विचारांच्या जनांचा नायक म्हणूनही तोच गणनायक योग्य ठरतो. अशा प्रकारचा स्वयंस्फूर्त उत्साह केवळ आणि केवळ गणरायाच्याबाबतीत पाहायला मिळतो. घरोघरी असणारे घरगुती गणपती आपापल्या परिवाराला, कुटुंबाला एकत्र करतात. कोकणात तर दिवाळीपेक्षाही अधिक महत्व गणेशोत्सवालाच असते. दूरदूरच्या नातेवाईंनासुद्धा जवळ आणण्याचे काम हा गणेशोत्सव करतो. म्हणजे नातेवाईकांमधले नातेसुद्धा ज्याच्यामुळे अधिक भक्कम होतं. असा हा गणपती वरदनायकसुद्धा ठरतो. सार्वजनिक स्तरावर हजारो गणेशमंडळांचे हजारो कार्यकर्ते रात्रंदिवस या गणेशभक्तीत स्वतःला झोकून देतात. केवळ आपल्या परिसरामध्ये प्रतिष्ठापित झालेल्या आणि सन्मानाने ज्याचे आगमन झालेले आहे अशा गणरायाची दहा दिवस यथाशक्ती, यथामती सुव्यवस्था ठेवण्याचे काम कार्यकर्ता ठेवतात. केवळ दिवसातून दोन तीनवेळा म्हटली जाणारी आरती, मंत्रपुष्पांजली, काही गणेशमंडळांमध्ये केले जाणारे अथर्वशीर्ष पठण, दहा दिवसाच्या काळात केले जाणारे सत्यनारायण काही ठिकाणी होणारे गणेशयाग अशी अल्प स्वरूपाची मंत्र किंवा शास्त्रार्थाने होणारी भक्ती थोडक्या स्वरूपात केली जाते. परंतु गणेशदर्शनासाठी येणाऱ्या भक्तांची व्यवस्था पाहाणं आणि पडेल ते काम करण्याची तयारी ठेवणं या गोष्टीदेखील गणरायाची भक्तीच मानून कार्यकर्ते झटत असतात. त्यांच्या या स्वयंस्फूर्त उत्साहाचे रहस्य म्हणजे हा गणेशोत्सव असतो. म्हणूनच सर्व थरातील लोकांना एकत्र आणून एक स्वयंस्फूर्त उत्साह केवळ याच उत्सवाच्या निमित्ताने अनुभवता येतो.

### भक्तीतील सूक्ष्मदृष्टी

जगातली एकमेव हिंदू संस्कृती आहे की जिच्यामध्ये व्यक्ती आणि समाजाला भक्तीच्या माध्यमातून शक्ती देण्याची किमया साधली. यासारखे उत्सव हा मानसिक भावनिक आणि सामाजिक ऊर्जे चा एक प्रचंड स्त्रोत ठरतो. यानिमित्ताने घडून येणारे सामाजिक अभिसरण समाजाला एकत्र तर करतेच. शिवाय अर्थकारणालादेखील त्यातून मोठे बळ मिळते. एकमेकांच्या गरजा भागवत असताना त्यातून निर्माण होणारा रोजगार हा या उत्सवाचा एक सुप्त आविष्कार ठरतो. या भक्तीला संघटित रूप दिल्याने त्यातून निर्माण होणारा आत्मविश्वास हा समाज व्यवस्थेला कुटुंब व्यवस्थेला अधिक घट्ट करणारा ठरतो. म्हणजेच अशा स्वरूपाचे हे उत्सव सामाजिक ऊर्जेचे उगमस्थान ठरतात. अतीउत्साहाचा प्रकारही यातून घडून येतो. म्हणूनच त्या उत्सवाचे महत्व आणि पावित्र्य कायम ठेवण्यासाठी काही नियमांची आवश्यकता भासू लागते. मग ध्वनी प्रदूषण असेल किंवा त्यातला झगमगाट असेल यातून उत्सवाच्या स्वरूपाला गालबोट लागणार नाही हे पाहाणेदेखील महत्त्वाचे ठरते. अगदी शंकराचार्यांपासून ते रामदास स्वामींपर्यंत सर्वांनी गणरायाचे केलेले वर्णन हे त्यातले तत्वज्ञानच समजावून सांगणारे आहे. गणेशाची मूर्ती तयार करून स्थूलस्वरूपात पूजाअर्चा होत असली तरी सूक्ष्म स्वरूपात या सगळ्या सृष्टीच्या कल्याणाचाच विचार व्यक्त होतो. इतक्या महाकाय गणरायाचे बारीकसे डोळे हे याच सूक्ष्म भक्तीचे किंवा दृष्टीचे प्रतीक ठरते. ज्याचे उदर मोठे आहे असा लंबोदल, सर्व प्रकारच्या भक्तांना सामावून घेणारा आणि आपल्या हाताने मोदकस्वरूपाचा म्हणजेच मोद याचा अर्थ आनंद असा होतो. मोदक स्वरूपाचा आनंद वितरित करणारा हा गणराय सर्वात मोठे आकर्षण ठरतो.

## सुविचार


**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**केलेले उपकार, दिलेला शब्द आणि उपयोगी पडलेली माणसं कधीही विसरायची नसतात .**

## पंचांग

**बुधवार, २७ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**

**भाद्रपद शुक्ल चतुर्थी**
**नक्षत्र : चित्रा**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते १९-२० कन्या**
**१९-२१ ते २४-०० तूळ**



**रवी उदय- ०६-२४**
**रवी अस्त- १८-५६**

**श्री गणेश चतुर्थी; पार्थिक गणेश मूर्ती पूजन संवत्सरी (चतुर्थी पक्ष); चंद्रास्त ९.२७; श्री वल्लभावतार - पिठापूर**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

### सुरती पनीर घोटाला



★ **साहित्य -** पनीर - २०० ग्रॅम ग्रेट करून, ३ मोठ्या आकाराचे टोमॅटो बारीक चिरून, भोपळी मिरची (मध्यम) - २ बारीक चिरून, ३ ते ४ अमूल चीज क्यूब ग्रेट करून, पावभाजी मसाला - १ १/२ चमचा, काश्मिरी लाल तिखट - १ चमचा, गरम मसाला - १ चमचा, कसुरी मेथी - १ चमचा, टोमॅटो केचप - २ चमचा, धणे जिरे पावडर - १ चमचा, बटर - १ चमचा, तेल - फोडणीसाठी अंदाजानुसार, पाणी - एक ते दीड वाटी (आमटीची वाटी), हिन्ग, हळद, मीठ चवीनुसार

★ **कृती-** कढईत तेल घ्या. तेल तापले की त्यात हिन्ग, हळद व बारीक चिरलेला टोमॅटो आणि भोपळी मिरची टाका. २ मिनिटानंतर त्यात सगळे मसाले टाका, बटर टाका आणि मीठ टाका. तेल सुटू लागले की त्यात पनीर टाका. नन्तर पाणी टाका. एक वाफ काढून त्यात किसलेले चीज टाका. २ मिनिटे वाफ काढा. सुरती पनीर घोटाला तयार हा सुरती पनीर घोटाला मसाला पाव बरोबर मस्त लागतो. त्यासाठी लादी पाव घ्यावा. तव्यावर बटर टाका, बटर वितळले की त्यात थोडे काश्मिरी लाल तिखट आणि कोथिंबीर टाका. पाव मधून कापून ह्या मिश्रणावर दोन्ही साईडने शेकून घ्या.



## सीबीएसई व्हॉलीबॉल स्पर्धा
# मिलेनियम स्कूल विजेते

■ पुणे

**पुणे** येथे झालेल्या १९, १७ आणि १४ वर्षांखालील मुलींच्या गटात जेतेपद पटकावत महाराष्ट्र, दादरा नगर हवेली आणि गोवा येथील शाळांसाठीच्या क्लस्टर नाईन सीबीएसई व्हॉलीबॉल स्पर्धेत वरचष्मा राखला. पुणे येथील ऑर्किड स्कूलने अंतिम फेरीत गोव्यातील नेव्ही चिल्ड्रन्स स्कूलवर २५-२३, २१-२५, २५-१९, २६-२४ असा संघर्षपूर्ण विजय मिळवत १९ वर्षांखालील मुलांच्या गटाचे विजेतेपद पटकावले.

या स्पर्धेत बारामती येथील विद्या प्रतिष्ठानने बीड येथील सिंदपाना पब्लिक स्कूलचे आव्हान २५-१९, १९-२५, १५-७ असे मोडीत काढताना १४ वर्षांखालील मुले गटात बाजी मारली. १७ वर्षांखालील मुलांच्या गटाच्या अंतिम फेरीत अरुणाल येथील न्यू होरायझन स्कूलने पन्हाळा येथील संजीवन पब्लिक स्कूलचा २५-२३, १९-२५, १५-७ असा पराभव केला. या स्पर्धेच्या सर्व वयोगटातील विजेते क्लस्टर नाईन अखिल भारतीय अंतिम फेरीसाठी पात्र ठरले आहेत.

# आशियाई नेमबाज स्पर्धा
# नीरु धांडाला सुवर्णपदक

**कझाकिस्तानच्या शिमकेंट इथे सुरु असलेल्या आशियाई नेमबाज चॅम्पियनशिप स्पर्धेत भारताच्या नीरु पांडाने सुवर्णपदक पटकावले. ट्रॅप प्रकाकारातली या सुवर्णपदाकामुळे कनिष्ट गटात भारतीय खेळाडूंचा दबदबा कायम राहिला आहे.**

■ शिमकेंट



**या** स्पर्धेत भारतीय खेळाडू चांगली कामगिरी करत आहेत. भारतासाठी पुरुष गटात भवनीश मेंदिरट्टाने रौप्यपदक जिंकले असून आशिमा अहलावतने कांस्यपदक जिंकले आहे.

अंतिम फेरीत नीरुने ४३ गुणांची कमाई केली. तिने कतारच्या बासिला रे व भारताच्याच आशिमा अहलावतला मागे टाकत सुवर्ण पदक पटकावले. पुरुषांच्या ट्रॅप प्रकारात भवनीशने ४५ गुण मिळवत रौप्यपदक पटकावले. तर चीनच्या यिंग की याने ४७ गुणांसह सुवर्णपदक जिंकले. भारताच्या नेमबाजांचे २५ मीटर पिस्तूल प्रकारात वर्चस्व राहिले. पायल खत्रीने सुवर्णपदक पटकावले तर नाम्या कपूरने रौप्य तर तेजस्विनीने कांस्य पदक पटकावले. मनू भाकर चौथ्या स्थानी तर ईशा सिंग सहाव्या स्थानी राहिली. व्हिएतनाम व चीनच्या खेळाडूंची कामगिरीही चांगली राहिली आहे.

# शिबीर आयोजनासाठी क्रीडा खात्याचे आवाहन

■ मुंबई

**राज्यात** जिल्हास्तरावर समाजसेवा शिबिर आयोजित करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी पुढे यावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर यांच्यातर्फे करण्यात आले आहे. या शिबीरासाठी क्रीडा विभागातर्फे आर्थिक अनुदानही देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनातर्फे युवक कल्याण क्षेत्रात कार्य करणाऱ्या नोंदणीकृत संस्थांना युवक कल्याण विषयक विविध प्रकल्पाच्या आयोजनासाठी आर्थिक सहाय्य देण्यात येते. शहरी युवकांना रचनात्मक कार्य करताना शारीरिक श्रमाची कल्पना देणे व समस्येबाबत चर्चा घडवून आणणे, हा या शिबिरामागील प्रमुख उद्देश आहे. अशा स्वयंसेवी संस्थांनी युवक विकासाला पूरक असे विविध प्रकल्प त्यांच्या कार्यक्षेत्रात आयोजित करुन सर्वांगिण विकास साधावा. शिबीर आयोजनासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून जास्तीत जास्त २५ हजार रुपये इतके अनुदान देण्यात येते. आयोजनासाठी इच्छुक संस्थांनी अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, येथे संपर्क साधावा.

## राष्ट्रीय सब-ज्युनियर फुटबॉल
# महाराष्ट्राच्या मुली उपांत्य फेरीत

■ भुवनेश्वर

**आसामच्या** जोरहाट येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय सब-ज्युनियर फुटबॉल स्पर्धेत महाराष्ट्राच्या (विफा) मुलींनी कमालीचे उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपांत्य फेरीत धडक मारली.

महाराष्ट्राच्या मुलींच्या संघाने क गटात इंडियन फुटबॉल असोसिएशन, पश्चिम बंगालवर ३-१ अशी मात करताना अंतिम चार संघांमध्ये स्थान मिळवले. सान्वी चौबे हिने दोन गोल करून विजयात मोलाचा वाटा उचलला. हिमानी रावत हिने एक गोल करत तिला चांगली साथ दिली. तत्पूर्वी, फुटबॉल असोसिएशन ऑफ ओडिशाचा यांचा ४-० असा धुव्वा उडवला होता. सलग दुसऱ्या विजयासह विफा संघाने क गटात अव्वल स्थान पटकावताना उपांत्य फेरी निश्चित केली.

# आशिया चषक क्रिकेट! ओमान संघाची घोषणा

■ मस्कत




**आशिया** चषक क्रिकेट सामन्यासाठी आज ओमान संघाची घोषणा करण्यात आली. १७ खेळाडूंच्या या दलाचे नेतृत्व सलामीचा फलंदाज जतिंदर सिंग याच्याकडे सोपवण्यात आले आहे.

ओमानच्या संघात चार नव्या खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. सुफियाना यूसुफ, जिक्रिया इस्लाम, फैसल शाह व नदीम खान हे पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय स्पर्धा खेळणार आहेत. ओमान संघाचा प्रशिक्षक श्रीलंकेचा फलंदाज दिलीप मेंडिसने म्हटले की, या स्पर्धेच्या माध्यमातून ओमानच्या संघाला भारत व पाकिस्तानसारख्या दिग्गज आशियाई संघांबरोबर खेळण्याची संधी मिळणार आहे. ओमान संघाची धुरा ३६ वर्षीय जतिंदर सिंग कडे आहे. मुळ चंदिगढचा या फलंदाजाने आपल्या क्रिकेटची सुरुवात २०१५ मध्ये अफगाणिस्तान विरुद्धच्या सामन्यातून केली होती. आयपीएल टी-२० मध्येही तो खेळलेला असून त्याने त्याने त्यात चांगल्या धावा केल्या आहेत. ओमान संघाचा पहिला सामना १२ सप्टेंबर रोजी पाकिस्तानबरोबर, दुसरा १५ सप्टेंबर रोजी संयुक्त अरब अमिरातीबरोबर तर १९ सप्टेंबरचा सामना भारताबरोबर होणार आहे. आशियाई चषकासाठी ओमानचा संघ या प्रमाणे आहे. जतिंदर सिंग (कर्णधार), विनायक शुक्ला, मोहम्मद नदीम, हम्माद मिर्झा, आमिर कलीम, सुफियान महमूद, आशीष ओडेड्रा, शकील अहमद, आर्यन बिष्ट, समय श्रीवास्तव, करण सोनावले, हसनैन अली शाह, मुहम्मद इमरान, सुफियान यूसुफ, नदीम खान, जक्रिया इस्लाम व फैसल शाह.

## घाटकोपर जॉली जिमखान्यात पहिली आंतर-क्लब व्हॉलीबॉल

■ मुंबई

**घाटकोपर** येथील जॉली जिमखान्यातर्फे येत्या ७ सप्टेंबर २०२५ रोजी पहिल्या आंतर-क्लब व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत, यजमान घाटकोपर जॉली जिमखानासह पी. जे. हिंदू जिमखाना, एनएससीआय क्लब आणि चेंबूर जिमखाना यासारख्या आघाडीचे क्लब सहभागी होणार आहेत. या संघांमध्ये लीग-कम-नॉकआउट स्वरूपात ही स्पर्धा होईल. या स्पर्धेत विजेते आणि उपविजेत्या खेळाडूंना बक्षीस म्हणून ट्रॉफी देण्यात येईल. याशिवाय सर्वोत्कृष्ट खेळाडू हा पुरस्कारही देण्यात येणार आहे.

# राज्यस्तरीय पिंच्याक सिलॅट पनवेलच्या खेळाडूंना ४ सुवर्ण

■ मुंबई




**महाराष्ट्र** पिंच्याक सिलॅट असोसिएशन आयोजित १५ व्या पिंच्याक सिलॅट राज्यस्तरीय स्पर्धेत पनवेलच्या खेळाडूंनी ४ सुवर्ण, ४ रौप्य आणि ३ कांस्य अशी ११ पदके मिळवून दैदिप्यमान कामगिरी केली.

खाईस्ट अकॅडमी स्कूल कोपरखैरणे (नवी मुंबई) येथे झालेल्या स्पर्धेमध्ये २६ जिल्ह्यातील ४८५ खेळाडूंनी सहभाग नोंदवला या स्पर्धेत प्री-टेन, सब-ज्युनियर, ज्युनियर मुला-मुली असे वयोगट होते. पनवेलच्या खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक योगेश बैकर व विरेश राठोड यांचे मार्गदर्शन लाभले. पदकविजेत्या खेळाडूंची २६ ते २८ सप्टेंबर २०२५ रोजी हुबळी (कर्नाटक) येथे होणाऱ्या १३व्या राष्ट्रीय पिंच्याक सिलॅट स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या स्पर्धेत तनिष्का मिश्रा, अर्चित जाधव, भावेश पाटील, ध्रुव सिंह यांनी सुवर्ण, स्वयम राम, शौर्य वर्धन दांडी, चैतन्य काकडे, आयुषी शिंदे यांनी रौप्यपदक व दर्शित माळी, स्वर्न भोईर, सानिया शेख यांनी कांस्यपदक पटकावले.

# आशियाई स्केटिंग स्पर्धा भारतीय खेळाडूंनी गाजवली

■ डेहराडून

**डेहराडून** येथे झालेल्या आशियाई ओपन शॉर्ट ट्रॅक स्पीड स्केटिंग ट्रॉफी २०२५ भारतीय खेळाडूंनी गाजवली आहे. या स्पर्धेत गती, सहनशक्ती आणि रणनीतीचे थरारक प्रदर्शन पाहायला मिळाले. जपान, थायलंड, चायनीज तायपेई, व्हिएतनाम, सिंगापूर आणि फिलिपिन्ससह नऊ देशांतील खेळाडूंनी या ऑलिंपिक हिवाळी क्रीडेत उत्साहाने सहभाग घेतला. भारताकडून सर्वाधिक प्रकाशझोतात राहिली महाराष्ट्राची ११ वर्षीय जिया गिरीश शेट्टी. ग्रुप डी (अंडर-१२) मध्ये खेळताना जियाने बर्फावर दाखवलेली सातत्यपूर्ण व निर्भय कामगिरी प्रेक्षकांच्या दादेला पात्र ठरली. तिने ३३३ मीटर आणि ५०० मीटर स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले, ७७७ मीटरमध्ये तिने रौप्यपदक पटकावले आणि मिश्र रिले मध्ये आणखी एक रौप्य मिळवत एकूण चार पदके आपल्या नावावर केली. या कामगिरीमुळे ती भारतासाठी सर्वोच्च पदकविजेती ठरली आहे.

# वेटलिफ्टिंगमध्ये सौम्या दळवीने नोंदवला नवा राष्ट्रकुल विक्रम

■ अहमदाबाद

**अहमदाबाद** येथे झालेल्या ज्युनियर राष्ट्रकुल वेटलिफ्टिंग स्पर्धेत ठाण्याच्या सौम्या दळवीने ४८ किलो वजनी गटात नवीन राष्ट्रकुल विक्रम नोंदवला. अहमदाबाद येथे झालेल्या या स्पर्धेत सौम्याने स्नॅच प्रकारात ७६ व क्लीन अँड जर्क प्रकारात १०१ असे एकूण १७७ किलो वजन उचलून नव्या राष्ट्रकुल विक्रमाची नोंद केली. सौम्याची हि कामगीरी वरिष्ठ गटात सुवर्ण पदक विजेती मीराबाई चानूनंतर दुसऱ्या क्रमांकाची ठरली. चानूने या स्पर्धेत एकूण १९६ किलो वजन उचलले होते. सौम्याने गेल्या वेळेसच्या ज्युनियर गटाच्या राष्ट्रकुल स्पर्धेत ४६ किलो गटात सुर्वणपदक पटकावले होते. सौम्या कल्याणच्या रिक्रेएशन व्यायामशाळेची खेळाडू असून ती पश्चिम रेल्वेत तिकीट तपासनीस असलेले वडील सुनील दळवी आणि समीर सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली वेटलिफ्टिंग खेळाचा सराव करते.

# बॉलीवूड सेलिब्रिटींचा गणपती बाप्पा

**आजपासून श्री गणेशोत्सव सुरु होत आहे. त्याच्या स्वागताची तयारी गेल्या काही दिवसांपासूनच सुरु झाली आहे. विघ्नहर्ताचे आगमन सर्वांचे मन मोहून टाकते. सर्वांचीच त्याच्यावर मनापासून श्रध्दा .लहान मोठे, गरीब -श्रीमंत , इतकेच काय बॉलीवूड सेलिब्रिटीज देखील मनोभावे गणपतीचा सण आनंदाने साजरा करत असतात. आणि बॉलीवूड व श्री गणपतीचे नाते अनेक युगापासूनचे आहे.**

**एक** काळ असा होता की, मुंबईमधील शुटिंग स्टुडिओमध्ये अनेक निर्मात्यांची कार्यालये होती. अनेक निर्मात्यांचे स्वतःच्या मालकीचे स्टुडिओ होते. त्यामुळे सण मोठ्या प्रमाणावर साजरे केले जात होते. दिवाळी, होळी, गणेशोत्सव या सणांच्या निमित्ताने भारतीय संस्कृती, धार्मिक परंपरा यांना महत्त्व दिले जात असे आणि या सणांच्या निमित्ताने चित्रपटसृष्टीमध्ये एकता निर्माण केली जात असे. नटराज, आर. के. स्टुडिओ, फिल्मालय अशा मुंबईतील अनेक स्टुडिओमध्ये हे सण मोठ्या उत्साहाने साजरे केले जात होते. मात्र आता ना हे स्टुडिओ राहिले आहेत आणि ना ते निर्माते. असं असले तरी बॉलीवूड आणि गणेशोत्सवांचे एक घट्ट नाते आहे. हा सण साजरा करण्यासाठी या क्षेत्रात धर्माला महत्त्व दिलं जात नाही, तर श्रद्धेला महत्त्व दिलं जातं. अनेक चित्रपट-टीव्ही सेलिब्रिटीज दरवर्षी मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने श्री गणेश उत्सव साजरा करतात. आपल्या घरी श्री गणेशाची मूर्ती स्थापित करून मनोभावे त्याची पूजा करतात.

वर उल्लेख केल्याप्रमाणे, एक काळ असा होता की शो मॅन राज कपूर यांनी आर.के. स्टुडिओ उभारल्यानंतर दरवर्षी मोठ्या उत्साहाने दहा दिवसांचा गणपती उत्सव साजरा करण्यास सुरुवात केली होती. चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकार, संगीतकार, निर्माता-दिग्दर्शक, गायक-गायिका आर. के. मधील गणेशोत्सवामध्ये सहभागी होत असत. अर्थात, दिवाळी, गणेशोत्सव, होळी हे सण साजरा करण्यामागे राज कपूर यांचे प्रमुख दोन उद्देश असत. एक म्हणजे, या सणांच्या निमित्ताने चित्रपटसृष्टीशी लोकांची आत्मीयतेने - प्रेमाने भेट होणे आणि आर. के. स्टुडिओमध्ये काम करणाऱ्या कामगारांना दोन घडी सुखाच्या आनंदाच्या मिळवणे हा उद्देश होता. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे गणपती विसर्जनासाठी ते आपल्या तीनही मुलांना घेऊन पायी जात असत. आर. के. च्या गणपतीचे विसर्जन बघण्यासाठी आणि त्यामध्ये सामील झालेले कलाकार बघण्यासाठी चेंबूर परिसरात दरवर्षी गर्दी जमत असे. राज कपूर यांचे निधन झाल्यानंतर देखील रणधीर, ऋषी आणि राजीव कपूर त्याचप्रमाणे नंतरच्या पिढीतील रणबीर कपूर स्टुडिओमध्ये गणेशोत्सव साजरा करत असत. परंतु २०१८ मध्ये आर.के. स्टुडिओ विकल्यानंतर रणबीर कपूर आपल्या घरी गणेशोत्सव साजरा करतो. त्यानिमित्ताने सर्व कपूर कुटुंब एकत्र जमतात.

अरे जा रे हट नटखट
ना छू रे मेरा घूँघट
पलट के दूँगी आज तुझे गाली रे
मुझे समझो न तुम भोली भली रे

नवरंग चित्रपटातील हे गाणे आजही दरवर्षी रंगपंचमीच्या हमखास वाजवले जाते. या गाण्यामध्ये एक सफेद रंगाची गणपतीची मूर्ती दिसते. ती मूर्ती खास या गाण्यासाठी चित्रपटाचे निर्माता-दिग्दर्शक व्ही. शांताराम यांनी मागवली होती. सिनेमासाठी जी प्रॉपर्टी, ड्रेपरी मागवतात, ती शूटिंग संपल्यानंतर त्या त्या विभागामध्ये ठेवली जाते. परंतु व्ही. शांताराम दरवर्षी गणेशोत्सवाला या गणपतीच्या मूर्तीची राजकमल स्टुडिओमध्ये पूजा करत असत. आजही गणेश चतुर्थीला या मूर्तीची पूजा केली जाते.

गणपती बाप्पा आणि बॉलीवूडचे चित्रपटांचे एक संगीतमय अतूट नाते आहे. आत्तापर्यंत अनेक हिंदी-मराठी चित्रपटांमध्ये श्री गणपतीची गाणी चित्रित केली गेली आहेत. अष्टविनायक या मराठी सिनेमातील सर्वच गाणी लोकप्रिय आहेत. गणपतीचे स्वागत करण्यासाठी, त्याचा उत्सव साजरा करण्यासाठी आणि त्याच्या विसर्जनाच्या वेळी हिंदी चित्रपटगीते वाजवली जातात. त्याशिवाय हा सण, उत्सव पूर्ण होत नाही. त्यापैकी ही टॉप १० गाणी...

- देवा हो देवा गणपती देवा, तुमसे बढकर कौन (हमसे बढकर कौन ) ,
- देवा श्री गणेशा (अग्निपथ - ऋतिक रोशन )
- श्री गणेशाय धीमहि (विरुद्ध)
- मोरया रे बप्पा (डॉन- शाहरुख खान)
- मोरया मोरया (उलाढाल-मराठी सिनेमा)
- शंभू सुताय मोरया (एबीसीडी)
- गणपती बप्पा मोरया (जुडवा २)
- वक्रतुंड महाकाय ( श्रीगणेश आरती -सरकार ३)
- गजानना गजानना (बाजीराव मस्तानी)
- तेरा ही जलवा (वॉन्टेड)

**● सलमान खान**

सिकंदर सलमान खान गेल्या काही वर्षांपासून आपल्या घरी श्री गणेशोत्सव मोठ्या आनंदाने साजरा करतो. सुरुवातीला त्याने घरात गणपतीची मूर्ती स्थापन केल्यानंतर मुस्लिम



समाजातील काही कट्टर व्यक्तींनी सलमान आणि त्याच्या कुटुंबीयांना विरोध दर्शवत त्यांच्यावर टीका केली होती. मात्र खान कुटुंबाने त्यांच्या विरोधाला न जुमानता श्री गणेश उत्सव साजरा करणे सुरूच ठेवले आहे. असे असले तरी गेल्या दोन वर्षांपासून सलमानच्या आई-वडिलांची - सलीम आणि सलमा खान यांची प्रकृती वयाच्या कारणाने ठीक नसल्यामुळे हा गणेशोत्सव सलमानची लहान बहीण अर्पिता खान-शर्माच्या घरी साजरा करण्यात येतो आणि तिथे सर्व खान कुटुंब एकत्रपणे पूजा-अर्चा करतात. दिड दिवसांच्या या गणेशोत्सवामध्ये कुटुंबातील सदस्यांसह जवळचे नातेवाईक आणि मित्र जमतात.

**● श्रद्धा कपूर आणि माधुरी दीक्षित**

श्रद्धा कपूर आणि माधुरी दीक्षित दरवर्षी आपल्या घरी श्री गणेशाची मूर्ती आणून पूजा करतात. सोनू सूद देखील दरवर्षी आपल्या घरी मोठ्या उत्साहाने गणेशोत्सव साजरा करतो. सणाच्या निमित्ताने श्रद्धा कपूरला मोदक आणि विविध पदार्थांवर ताव मारायला खूप आवडतो



तर माधुरी दीक्षित उकडीचे मोदक करून त्याचा आनंद घेत असते.

**शिल्पा शेट्टी**

अभिनेत्री शिल्पा शेट्टी दरवर्षी मोठ्या उत्साहाने मुले, पती राज कुंद्रा, बहीण शमिता आणि आई सुनंदा यांच्यासह श्री गणेश उत्सव साजरा करते. तिला सर्व सण मोठ्या पारंपरिक पद्धतीने साजरे करायला आवडतात. दर वर्षी ती एक ठराविक आकाराच्या श्री गणेश मूर्तीची घरी



स्थापना करते. यावेळी शिल्पा स्वतः गणपतीची आरास करते तसेच घरामध्ये रांगोळी काढते.

**● जीतेंद्र**

जेष्ठ अभिनेता जीतेंद्र गेली अनेक वर्ष आपल्या घरी श्री गणपती उत्सव साजरा करत आहेत. यावेळी रोज ते स्वतः सोवळे नेसून गणपतीची पूजा-अर्चा करतात. हेमा मालिनी, राकेश रोशन, प्रेम चोप्रा आदी अनेक कलाकार या उत्सवाला जीतेंद्र यांच्याकडे जातात.

**● गोविंदा**

अभिनेता गोविंदा धार्मिक वृत्तीचा आहे आणि दरवर्षी आपल्या घरी श्री गणेशाची प्रतिष्ठापना करत असतो. जीतेंद्रप्रमाणे गोविंदा देखील सोवळ्याने श्री गणेशाची पूजा करतो व रोज सकाळ संध्याकाळ आरती म्हणतो.

**● शाहरुख खान- दिया मिर्झा**

बादशाह शाहरुख खान आणि अभिनेत्री दिया मिर्झा धर्माने मुस्लिम असून देखील गेली अनेक वर्ष आपल्या घरी गणपतीची मूर्ती स्थापन करुन मनोभावे पूजा करतात. पर्यावरणाचा विचार करत, दियाचा इको-फ्रेंडली गणेश मूळ आणण्याकडे कल असतो. शाहरुख खान आपल्या चाहत्यांना दरवर्षी गणेशोत्सवाच्या शुभेच्छा देत असतो. गेल्या वर्षी शाहरुखने गणेशाच्या मूर्तीचा एक फोटो आपल्या सोशल मीडियावर शेअर करत लिहिले



होते की, गणपति बप्पा जी, आपका घर में स्वागत है। आपल्याला व आपल्या कुटुंबाला गणेशोत्सवाच्या शुभेच्छा. गणपती बाप्पा आपल्या सर्वांना आनंद, बुद्धी, स्वास्थ्य आणि खूप सारे मोदक खाण्याचा आशीर्वाद देवोत.

**● रकुल प्रीत सिंग**

अभिनेत्री रकुल प्रीत सिंगने लग्न झाल्यानंतर आपल्या सासरी म्हणजे पती जॅकी भगनानी यांच्या घरी पहिल्यांदाच श्री गणपति बप्पाची स्थापना केली. रकुल गणेश भक्त आहे, त्यामुळे ती हा सण मोठ्या आनंदाने साजरा करते.

टीव्ही माध्यमातील करण वाही, गुरमीत चौधरी, जूही परमार हे कलाकारसुध्दा दरवर्षी श्री गणेशोत्सव साजरा करतात.

# संजयची मुलगी त्याच्यावर नाराज ?

अभिनेता संजय दत्त सध्या पत्नी मान्यता आणि दोन जुळ्या मुलांसह आनंदाने संसार करत असला तरी, पहिली पत्नी ऋचा शर्मापासून त्याला त्रिशाला ही मुलगी आहे. त्रिशालाचा जन्म १९८८ साली झाला होता. त्यानंतर १९९६ मध्ये ब्रेन ट्युमरमुळे ऋचाचे निधन झाले होते. त्रिशालाने नुकतीच आपल्या कुटुंबाविषयी आणि आपल्या मानसिक स्वास्थ्याविषयी एक गूढ पोस्ट इंस्टाग्रामवर शेअर केली आहे. संजयला तिने २९ जुलैला त्याच्या वाढदिवसाच्या शुभेच्छांचा संदेश पाठविल्याच्या १५ दिवसांनंतर त्रिशालाने इंस्टाग्रामवर एक लांबलचक पोस्ट लिहिली आहे. आपल्या पोस्टमध्ये तिने लिहिले आहे की, आपल्या रक्ताच्या प्रत्येक नात्याला तुमच्या आयुष्यात जागा मिळू नये. कधी कधी सर्वात अधिक थकवणारे लोक, ज्यांना आपण ओळखतो आणि त्यांना कुटुंब म्हणत असतो, तुम्हाला तुमची शांतता देण्यासाठी स्वातंत्र्य देतात. कधी कमी तर कधी तुम्हाला अजिबात संपर्क न साधण्याचे स्वातंत्र्य मिळते. तुम्हाला कुटुंबाची प्रतिमा चांगली ठेवण्याऐवजी आपली मानसिक स्वास्थ्य निवडण्याचा अधिकार आहे. कारण कुटुंब तुमच्या चुकीच्या वागण्याला किंवा स्वतः




ला दोषी मानण्याचे स्वातंत्र्य देत नाही. तुम्हाला अशा कुठल्यातरी व्यक्तीसोबत जोडून राहण्याची आवश्यकता नाही, जो तुम्हाला दुःख देत राहतो, भले त्याने तुमचे पालन केले असेल. जेव्हा आई-वडील या गोष्टीची अधिक पर्वा करतात की कुटुंबात राहणे कसे आहे यापेक्षा ते लोकांना कसे दिसत आहे, तर मग ही समस्या आहे. अर्थात, या पोस्टमध्ये त्रिशालाने कुणाचेही नाव लिहिलेले नसले तरी, संजय दत्त व तिच्या नात्यावर ही पोस्ट नक्कीच प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. संजयच्या वाढदिवसाच्या दिवशी त्रिशालाने त्याच्यासह आपला एक जुना फोटो शेअर केला होता, व त्याखाली लिहिले होते की, 'दररोज तुमच्यावर अधिकाधिक प्रेम करते.' त्रिशाला अमेरिकेमध्ये मानसोपचारतज्ज्ञ आहे.

# यश सैयारापेक्षा चांगला चित्रपट करत आहे

अहान पांडे आणि अनित पड्डा यांचा रोमँटिक संगीतमय चित्रपट सैयारा ने बॉक्स ऑफिसवर खूप यश कमावले आहे. कमी बजेटमध्ये बनलेल्या या सिनेमाने निर्मात्याला चांगली कमाई करून दिली आहे. अहान पांडे आणि अनित पड्डा यांचे देखील कौतुक केले जात आहे. अशातच आता अभिनेता गोविंदाची पत्नी सुनीता आहुजाने सैयाराबाबत आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. बिनधास्त, फटकळ बोलण्यासाठी सुनीता प्रसिद्ध आहे. आपल्या या स्वभावामुळे सोशल मीडियावर ती खूप व्हायरल होते, प्रत्येक सोशल मीडिया पत्रकार तिची मुलाखत घेण्यासाठी उतावीळ असतो. ही गोष्ट सुनीताच्या देखील चांगलीच लक्षात आली आहे. त्यामुळे मीडियाला अपेक्षित असणारी सनसनाटी, चटपटीत वक्तव्य करून सुनीता सध्या खूप प्रसिद्धी मिळवत आहे. एका मुलाखतीदरम्यान पत्रकाराने तिला प्रश्न विचारला की, तुमचा मुलगा यश एवढा हँडसम आहे तर त्याला 'सैयारा' मध्ये संधी मिळायला हवी होती असं तुम्हाला वाटतं का? या प्रश्नावर सुनीता म्हणाली, कदाचित हो, पण यश सैयारा पेक्षा चांगला चित्रपट करत आहे. मी अद्याप 'सैयारा' पाहिला नाही. पण यशने तो सिनेमा दोनवेळा बघितला आहे. मी देखील बघेन. जी नवी मुलं या क्षेत्रात येत आहेत, त्यांनी नाव कमवावे हीच माझी इच्छा आहे. यश सध्या दिग्दर्शक साई राजेशचा तेलुगू चित्रपट बेबी च्या हिंदी रिमेकमध्ये काम करत आहे.

# मनीषचा 'गुस्ताख इश्क - कुछ पहले जैसा'

लोकप्रिय फॅशन डिझायनर मनीष मल्होत्राने नुकताच आपला पहिला सिनेमा ''गुस्ताख इश्क - कुछ पहले जैसा चा टीझर प्रदर्शित केला आहे. हा सिनेमा जुन्या जमान्यातील एका ऐतिहासिक प्रेमकथेवर आधारित असून यामध्ये अभिनेता विजय वर्मा, अभिनेत्री फातिमा सना शेख, ज्येष्ठ अभिनेता नसीरुद्दीन शाह आणि शारिब हाश्मी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. चित्रपटाचे संगीतकार विशाल भारद्वाज आहेत, तर गीतकार आहेत गुलजार. नसीरुद्दीन शाहनी या चित्रपटामध्ये खलनायकाची व्यक्तिरेखा साकार केली आहे. या सिनेमाचे शीर्षक आधी 'उल जलूल इश्क' असे ठेवण्यात आले होते, परंतु आता नव्या शीर्षकाने टीझर प्रदर्शित करण्यात आला आहे: 'गुस्ताख इश्क - कुछ पहले जैसा'. हा चित्रपट यावर्षी नोव्हेंबर महिन्यात प्रदर्शित होणार असून, या चित्रपटाद्वारे मनीष मल्होत्राने दिग्दर्शनात पदार्पण केले आहे



# तो राग प्रेमाचा असतो

लोकप्रिय गायक अमाल मलिकने आता बिग बॉस १९ या शोमध्ये एन्ट्री घेतली आहे. गेल्या काही काळापासून अमाल कौटुंबिक वाद व नैराश्य यामुळे वादाच्या भोवऱ्यात आहे. एका पॉडकास्टमध्ये अमालने आपल्या काकावर आणि संगीतकार अनु मलिकवर काही गंभीर आरोप केले होते. त्याने सांगितले होते की, अनु मलिकमुळे माझ्या वडिलांचे, डब्बू मलिकची कारकिर्द यशस्वी होऊ शकली नाही. माझ्या वडिलांनी या क्षेत्रात काम करावे अशी अनु मलिकची इच्छा नव्हती. आता अनुने पुतण्या



अमाल व भाऊ डब्बू मलिक यांच्याविषयी मनमोकळेपणाने आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. काय म्हणाला अनु मलिक? आपल्या अधिकृत इंस्टाग्राम हँडलवर अनुने नुकताच एक व्हिडिओ शेअर केला असून त्यामध्ये तो आपल्या कुटुंबाविषयी बोलत आहे. अनुने साफ शब्दांत सांगितले आहे की, डब्बू मलिक आणि अबू मलिक माझे केवळ भाऊ नसून माझ्या काळजाचे तुकडे आहेत. त्यांच्या मुलांच्या बाबतीत सांगायचे तर, त्या देखील माझ्यासाठी जीव की प्राण आहेत. कुणी सांगितले की, मला राग येतो, तर ठीक आहे. हे मलिकांचे वैशिष्ट्य आहे. तो राग प्रेमाचा असतो. आम्ही भावंडे एकत्र होतो आणि नेहमी एकत्र राहू.



# हनीचा दानशूरपणा

रॅपर हनी सिंग सध्या आपल्या संगीतमय कार्यक्रमांसाठी खूप चर्चेत आहे. मात्र आता सोशल मीडियावर एका खास कारणामुळे तो चर्चेत आला आहे. नुकताच त्याचा एक सर्वांच्या मनाला भावणारा व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओने सोशल मीडिया युजर्सचे लक्ष वेधले आहे. या व्हिडिओमध्ये आपल्याला दिसते की, हनी सिंग एका रस्त्याच्या कडेला बसून गरीब मुलांना खाणे वाटत आहे. झाले असे की, काही दिवसांपूर्वीच हनी आपल्या दिल्ली येथील घरी परतला आहे. त्यावेळी तो नोएडाला देखील गेला होता. आपल्या कारमध्ये बसला असताना रस्ताच्या बाजूला लहान मुले बसलेली असल्याचे हनीला दिसले. त्याने ताबडतोब आपली गाडी थांबवली आणि हल्दीराम रेस्टॉरंट मधून त्यांच्यासाठी जेवण मागवले. त्याच्या या कृत्याने ती लहान मुलं खूप खुश झाली. मात्र या घटनेमुळे नोएडा सेक्टर ६३ च्या इलेक्ट्रॉनिक मेट्रो स्टेशनवर हनीला बघण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी जमली. हनी सिंगने आपल्या अधिकृत इंस्टाग्राम अकाऊंटवर त्या हसणार्या मुलांचे फोटो शेअर केले आहेत. हनीच्या या दानशूरपणाचे युजर्स कौतुक करत आहेत.

# तान्याला हवा गरीब नवरा

महाकुंभ मेळ्यामुळे व्हायरल झालेली व आपण उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश सरकारच्या पर्यटन मंत्रालय विभागाशी निगडीत असल्याचे सांगणारी करोडोंची मालकीण तान्या मित्तल आता बिग बॉस १९ च्या शोमध्ये सहभागी झाली आहे. २५ वर्षीय तान्या सर्वात कमी वयाची सर्वात श्रीमंत सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर असल्याचे तिच्या बाबतीत सांगितले जाते. रिॲलिटी शोमध्ये जाण्यापूर्वी दिलेल्या एका मुलाखतीमध्ये तान्याने आपल्या लग्नाविषयी इच्छा बोलून दाखवली होती. तिने सांगितले की, आता लग्न करायची तिची इच्छा आहे, पण माझा नवरा गरीब असावा अशी माझी इच्छा आहे. तिच्याच शब्दात सांगायचे तर, मला लग्न करायचे आहे. आता एका गरीब मुलाला श्रीमंत मुलगी मिळायला हवी. तिच्या या बोलण्यावर पत्रकाराने तिला विचारले की, नवर्यावर हुकूम चालवता यावा म्हणून तुला गरीब मुलाशी लग्न करायचे आहे का? यावर तान्याने सांगितले की, मी काय कुणावर हुकूम चालवणार? पण या जगात एखादा मुलगा तरी असा असायला हवा, जो घर चालवायचे आहे या चिंतेशिवाय जगू शकेल.

नवा काळ

• पुणे | बुधवार २७ ऑगस्ट, २०२५ • पान -८

# अहमदाबादेत भटक्या कुत्र्यांसाठी अन्न केंद्र

**अहमदाबाद-** भटक्या कुत्र्यांसाठी लवकरच अहमदाबाद शहरात अन्न केंद्र स्थापन केले जाणार आहे. नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने शहरांमध्ये भटक्या कुत्र्यांसाठी खाण्याच्या जागा तयार करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने प्राणी जन्म नियंत्रण कायद्याच्या अंमलबजावणीसाठी महापालिकेने हे पाऊल उचलले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर उद्याने, रस्ते यासारख्या सार्वजनिक ठिकाणी कुत्र्यांना खाऊ घालण्यावर बंदी आहे. त्यामुळे प्राणी कल्याण आणि मानवी सुरक्षितता यामध्ये समतोल साधण्याच्या दृष्टीने हे पाऊल टाकण्यात येत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. यासंदर्भात अहमदाबाद महापालिकेकडून याबाबत लवकरच मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या जाणार आहेत.



## सुतारगल्ली १ येथे महाराष्ट्रातील पहिला फायबर फोल्डेबल बाप्पा

■ मुंबई

**मुंबईतील** गिरगाव येथील १ली सुतार गल्ली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने यावर्षी पर्यावरणपूरकता आणि तंत्रज्ञानाचा संगम साधत महाराष्ट्रातील पहिल्या फोल्डेबल फायबर मूर्तीची स्थापना केली आहे. तब्बल ३९ फूट उंचीची ही भव्य मूर्ती गणेशोत्सवाचे आकर्षण ठरत आहे.

या मूर्तीची संकल्पना मंडळाचे कार्याध्यक्ष भूषण सांगळे, त्यांचे भाऊ सिध्दिविनायक ट्रस्टचे सदस्य सुदर्शन सांगळे, आदेश मोघे, अजय जाधव आणि संदेश उमरोटकर यांची आहे. मूर्तीचे मूर्तिकार प्रशांत देसाई अनेक वर्षांपासून या मंडळासाठी काम करत आहेत. यावर्षी त्यांनी कौशल्याने ही अद्वितीय मूर्ती साकारली.

या मूर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे ती फायबरपासून तयार केली असून, फोल्डेबल आहे. गणेशोत्सवानंतर मूर्तीचे हात-पाय सुटे करून विशेष बॉक्समध्ये सुरक्षित ठेवता येतील. त्यामुळे दरवर्षी मूर्ती विसर्जनाच्या नावाखाली पर्यावरणाचे होणारे नुकसान कमी होईल. पुढील वर्षी हीच मूर्ती पुन्हा पूर्ण स्वरूपात साकारता येणार आहे. ३ फुटांचा बाप्पांचा चेहरा, ६ फूट उंच सिंहासन आणि त्यामागील ८ ते १० फूट उंच प्रभावळ लक्ष वेधून घेत आहे. प्रभावळ फोल्डिंग असल्याने विसर्जन मिरवणुकीदरम्यान रस्त्यांवरील अडथळे सहज पार करता येणे शक्य आहे. मूर्तीच्या मागे दक्षिणेतील कालिमातेची भव्य मूर्ती आहे. सुमारे ७२ मीटर जरीकाठाचे मलमलचे वस्त्र आणि विशेष कंबरपट्टा बाप्पाला परिधान केला जातो. विसर्जनाच्या दिवशी मूर्ती समुद्रात नेली जाईल. परंतु विसर्जनासाठी स्वतंत्र पूजेची २ फूट उंच मूर्ती करण्यात आली आहे.

या मंडळातर्फे दरवर्षी रक्तदान, कॅन्सर तपासणी शिबिरे, पूरग्रस्तांसाठी मदत अशी अनेक सामाजिक कार्ये केली जातात.





जेएसबी माटुंगा गणेशमुर्ती (छाया: दीपक साळवी)

## अमित शहा महिनाअखेरीस लालबाग राजाच्या दर्शनाला

■ मुंबई

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा महिनाअखेरीस २९ आणि ३० ऑगस्ट रोजी मुंबई दौऱ्यावर असणार आहेत. या दौऱ्यादरम्यान ते प्रसिद्ध लालबागचा राजा गणपती आणि इतर गणपतींचे दर्शन घेणार आहेत.

गेल्या काही वर्षांपासून शहा हे गणेशोत्सवाच्या काळात नियमितपणे लालबागचा राजाच्या दर्शनाला येतात. यंदाही ते मुंबईतील धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत.

## पतीसोबत खडसेही संकटात ७ महिलांची पोलिसांत धाव

■ पुणे

रेव्ह पार्टी प्रकरणात डॉ. प्रांजल खेवलकर यांच्यासोबतच आता त्यांची पत्नी व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांच्याही अडचणीत मोठी वाढ झाली आहे. खराडीतील आलिशान हॉटेलमध्ये झालेल्या पार्टीवेळी धाड टाकून पुणे पोलिसांनी खेवलकरला अटक केली होती. या प्रकरणी आता ७ ते ८ महिलांनीही पोलिसांशी संपर्क साधत गंभीर आरोप केल्याची माहिती समोर आली आहे.

पोलीस तपासात खेवलकरच्या मोबाईलमधून आक्षेपार्ह फोटो, व्हिडिओ आणि महिलांचे चोरून केलेले ऑडिओ रेकॉर्डिंग समोर आले आहे. संबंधित महिलांनी सहमतीशिवाय संबंध ठेवले, ब्लॅकमेलसदृश रेकॉर्डिंग केले. तसेच त्यांचा गैरवापर झाल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणामुळे खेवलकरविरोधात आणखी गुन्हे दाखल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## आष्टीत वरिष्ठ स्तरावरील दिवाणी न्यायालय लवकरच

■ मुंबई

**बीड** जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात वरिष्ठ स्तरावरील दिवाणी न्यायाधीश न्यायालय स्थापन करण्यास राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे न्यायदानाची प्रक्रिया अधिक गतिमान होणार असून, नागरिकांना न्यायासाठी दूरवर जाण्याची गरज भासणार नाही. या नव्या न्यायालयासाठी न्यायिक अधिकारी व कर्मचारीवर्गाची पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. न्यायालयीन कामकाजासाठी लागणारी इमारत, पायाभूत सुविधा, वेतन व इतर आवश्यक खर्चासाठी राज्य सरकारकडून मंजुरी देण्यात आली आहे. हा निर्णय विधी व न्याय विभागाअंतर्गत घेण्यात आला आहे.

आष्टी तालुक्यात सुरू होणाऱ्या या वरिष्ठ स्तरावरील दिवाणी न्यायालयात प्रामुख्याने सिव्हिल खटले, मालमत्तेचे वाद, कर्जवसुली प्रकरणे तसेच इतर दिवाणी विषयक वाद स्थानिक पातळीवरच निपटवले जाणार आहेत. त्यामुळे नागरिकांना बीड शहर किंवा औरंगाबादला वारंवार न्यायालयीन कामकाजासाठी जाण्याची वेळ टळणार आहे.

## नवी मुंबईत दोन्ही मतदारसंघांत ७६ हजार मतदारांची दुबार नावे

**काँग्रेस पक्षाचा आरोप नावे वगळण्याची मागणी**

■ नवी मुंबई

**नवी मुंबई** महापालिका क्षेत्रात येणाऱ्या ऐरोली आणि बेलापूर या दोन्ही विधानसभा मतदारसंघात ७६ हजारांहून अधिक मतदारांची नावे दुबार आहेत, असा गंभीर आरोप काँग्रेसचे नवी मुंबई जिल्हा प्रवक्ते रवींद्र सावंत यांनी केला आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही दुबार नावे मतदार यादीतून वगळावी, अशी लेखी मागणीही त्यांनी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.



सावंत यांनी आपल्या निवेदनात म्हटले की, नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात दोन्ही विधानसभा मतदारसंघात जवळपास ७६ हजारांहून अधिक दुबार नावे आहेत. ऐरोली मतदारसंघात ४१ हजार ५५६ आणि बेलापूरमध्ये सुमारे ३५ हजार दुबार नावे आहेत. विशेष म्हणजे ऐरोलीत मतदारसंघाच्या यादीतली नावे ही बेलापुरातही आहेत. म्हणजेच सकाळी एकीकडे मतदान करा आणि दुपारनंतर दुसरीकडे मतदान करा, असा प्रकार होत असल्याचा संशय बळावत आहे. वास्तविक, ७६ हजार मतदारांपेक्षा अधिक घोळ हे नियोजित षड्यंत्र असण्याची शक्यता आहे.

## सुप्रीम कोर्टाची उच्च न्यायालयावर टीका! तीन महिन्यांत निर्णयाचा आदेश

■ नवी दिल्ली

**उच्च** न्यायालयात सुनावणी पूर्ण होऊनही निकालात होणाऱ्या अतिविलंबाबद्दल सर्वोच्च न्यायालयाने चिंता व्यक्त केली. एखाद्या प्रकरणात सुनावणी पूर्ण झाल्यानंतर तीन महिन्यांत निकाल देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले. रवींद्र प्रताप शाही विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य या खटल्याच्या सुनावणीवेळी न्यायालयाने असा अतिविलंब अत्यंत धक्कादायक आणि आश्चर्यकारक असल्याचे मत मांडले.

न्या. संजय करोल आणि न्या. प्रशांत कुमार मिश्रा यांच्या पीठासमोर ही सुनावणी झाली. हा खटला आरोपी रविंद्र प्रताप शाही यांनी दाखल केलेल्या अपीलवर आधारित होता. २००८ पासून प्रलंबित असलेल्या एका फौजदारी प्रकरणात अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम आदेशाविरोधात हे अपील करण्यात आले होते. या प्रकरणातील सुनावणी २४ डिसेंबर २०२१ रोजी पूर्ण झाल्यानंतर निकाल राखून ठेवण्यात आला. एक वर्ष उलटूनही निकाल जाहीर करण्यात आला नाही. त्यामुळे प्रकरण दुसऱ्या पीठाकडे वर्ग करण्यात आले.



सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले की लवकर निकाल द्यावा म्हणून वारंवार अर्ज केले तरीही अंतिम निर्णय दिला गेला नाही. हे अत्यंत धक्कादायक आणि आश्चर्यजनक आहे. अपील पूर्णपणे ऐकूनही वर्षभर निकाल दिला गेला नाही. सुनावणी पूर्ण झाल्यानंतर एक-एक वर्षापर्यंत निकाल दिला जात नसल्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. जुन्या निर्णयांचा दाखला देत वेळेवर निकाल देणे हा न्यायदान व्यवस्थेचा अत्यावश्यक भाग असल्याचे कोर्टाने सांगितले.

या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने प्रत्येक उच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रारला त्या महिन्यात राखून ठेवलेले, पण निकाल न दिलेल्या प्रकरणांचा तपशील असलेला एक मासिक अहवाल तयार करण्यास सांगितले.

## अमेरिकेत कर्नालच्या तरुणाचा अपघाती मृत्यू

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेतील** रस्ते अपघातात कर्नाल येथील एका २४ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. आशिष मान असे या तरुणाचे नाव आहे. तो गेल्या एक वर्षापासून अमेरिकेत ट्रक चालक म्हणून काम करत होता. त्यापूर्वी भारतात ट्रक चालवत असे. तो कर्नालच्या वजीर चंद कॉलनीचा रहिवासी होता.

तो २०२३ मध्ये बेकायदेशीर मार्गाने अमेरिकेला गेला होता. त्याच्या कुटुंबाने ४५ लाख रुपयांचे कर्ज काढून त्याला अमेरिकेला पाठवले होते. तो तीन भावांमध्ये सर्वात लहान होता. त्याचा ट्रक झाडाला धडकल्याने हा अपघात झाला. त्याच्या मृत्यूची बातमी कळताच संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

## यशवंत सहकारी साखर जमीन विक्रीला सरकारकडून मान्यता

■ पुणे

**पुण्यातील** हवेली तालुक्यातील थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या जमिनीच्या विक्रीला राज्य मंत्रिमंडळ बैठकीत अखेर मंजुरी देण्यात आली आहे.

गेल्या १५ वर्षांपासून आर्थिक अडचणींमुळे हा कारखाना बंद आहे. कारखान्याचे मोठे बँक कर्ज, शेतकऱ्यांची थकीत ऊसबिले, कामगारांचे पगार, शासनाची देणी तसेच इतर व्यापारी देणी यामुळे कारखाना सुरू होणे अशक्य झाले होते. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या ताब्यात असलेल्या या कारखान्याला पुन्हा गाळप हंगाम सुरू करण्यासाठी मोठ्या निधीची आवश्यकता होती. त्यासाठी कारखान्याची बँकेकडे तारण ठेवलेली ९९.२७ एकर जमीन विक्री करण्याचा ठराव सभासदांनी घेतला होता. ही जमीन २९९ कोटी रुपयांना हवेली कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे यांना विकण्याचा प्रस्ताव करण्यात आला होता. आता मंत्रिमंडळाने या प्रस्तावाला परवानगी दिल्यामुळे यशवंत कारखाना पुन्हा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## शिंदेंच्या तानाजी सावंतांचे बंधू शिवाजी सावंत भाजपात

■ सोलापूर

आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असून, सोलापूर जिल्ह्यातील शिवसेना (शिंदे गट) ला मोठे खिंडार पडण्याची चिन्हे आहेत. आमदार व माजी मंत्री तानाजी सावंत यांचे बंधू सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजी सावंत यांनी शिंदेसेनेचा राजीनामा देत भाजपामध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे.

शिवाजी सावंत यांच्या रूपाने भाजपाने शिंदे सेनेचा एक महत्त्वाचा नेता गळाला लावला आहे. हा शिंदे गटासाठी सोलापुरात मोठा धक्का असल्याची चर्चा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत माढा तालुक्यात मोठ्या कार्यक्रमात शिवाजी सावंत यांचा पक्षप्रवेश होणार आहे. गणेशोत्सवानंतर हा सोहळा पार पडेल. या प्रवेशाची अद्याप अधिकृत तारीख जाहीर झालेली नाही. शिवाजी सावंत यांच्यासह सोलापूरमधील ४० पदाधिकारीही भाजपात प्रवेश करणार आहेत. दरम्यान, शिवाजी सावंत यांच्या भाजपात जाण्याच्या चर्चा सुरू झाल्यानंतर दोन दिवसांपूर्वी तानाजी सावंत यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भेटीसाठी बोलावले होते.

## शिवभोजन थाळीचे बिल थकले मंत्रालयाच्या गेटसमोर आंदोलन

■ मुंबई

**शिवभोजन** थाळीयोजनेंतर्गत बचत गटांच्या महिला कार्यकर्त्यांनी थकित बिलांच्या मागणीसाठी मंत्रालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर आज आंदोलन केले. यावेळी आंदोलन करण्याचा प्रयत्न करत असलेल्या या महिला कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. मंत्रालय परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

या आंदोलनात महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतून आलेल्या महिला सहभागी होत्या. विशेष म्हणजे काही दिव्यांग महिलांनीही या आंदोलनात सहभाग घेतला. आंदोलक महिलांच्या मते, शिवसेनेच्या काळात सुरू झालेली ही योजना सध्या राजकीय दुर्लक्षाची बळी ठरली आहे. शिवभोजन थाळी ही फक्त शिवसेनेची योजना आहे म्हणून भाजपा आणि महायुती तिच्याकडे दुर्लक्ष करत आहेत. गोरगरिबांना स्वस्त जेवण मिळू नये असा सरकारचा प्रयत्न आहे काय? आंदोलक महिलांनी आरोप केला की, सरकार लाडकी बहीण योजनेसाठी कोट्यवधींचा निधी जाहीर करते. मात्र गोरगरिबांसाठी असलेल्या शिवभोजन थाळीचे आठ-नऊ महिन्यांचे थकीत बिले देण्यात सरकार अपयशी ठरत आहे. शिवभोजन थाळी बंद होऊ देणार नाही. गरिबांचा घास बंद करणाऱ्या सरकारविरोधात लढा सुरूच राहील. दरम्यान, गेल्या ८-९ महिन्यांपासून थाळी पुरवठादारांना पैसे न मिळाल्याने अनेक बचत गट कर्जबाजारी झाले आहेत.

## नवाब मलिकांविरोधात पुरावे नाहीत वानखेडे प्रकरणात पोलिसांचा अहवाल

■ मुंबई

**राष्ट्रवादी** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री नवाब मलिक यांच्यावरील मानहानीच्या आरोपांवरून एनसीबीचे माजी अधिकारी समीर वानखेडे यांच्या बहिणीला मोठा धक्का बसला आहे. वानखेडे यांची बहीण यास्मिन वानखेडे यांनी मलिकांविरोधात बदनामी आणि छेडछाड केल्याचा आरोप केला होता. यावर अंबोली पोलिसांनी अंधेरी महानगर दंडाधिकारी न्यायालयासमोर तपास अहवाल सादर करत मलिकांविरोधात कोणताही पुरावा सापडला नसल्याचे स्पष्ट केले.

यंदा जानेवारी महिन्यात न्यायालयाने पोलिसांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. नंतर या प्रकरणी तपासाला उशीर का झाला याची विचारणा करत न्यायालयाने पोलिसांना नोटीस बजावली होती. त्यानंतर हा अहवाल न्यायालयासमोर सादर करण्यात आला.

## विश्वस्त संस्थांचे काम पारदर्शक होणार

**मुंबई -** राज्य मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील सार्वजनिक विश्वस्त संस्थांचे कार्य अधिक पारदर्शक, उत्तरदायी आणि परिणामकारक होण्यास मदत होणार आहे. सार्वजनिक विश्वस्तांच्या माध्यमातून विविध धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक व परोपकारी कार्ये राज्यभर राबवली जातात. मात्र, वाढत्या कामकाजाच्या पार्श्वभूमीवर विद्यमान कायद्यात आवश्यक सुधारणा करणे गरजेचे झाले होते. सुधारणा झाल्यानंतर विश्वस्तांच्या नियुक्ती, त्यांचे अधिकार-कर्तव्य, आर्थिक पारदर्शकता, नोंदणी प्रक्रिया आणि देखरेख याबाबत अधिक स्पष्टता येणार आहे.

## आपच्या सौरभ भारद्वाज यांच्या घरावर ईडीची छापेमारी

■ नवी दिल्ली

**आम** आदमी पक्षाचे (आप) नेते माजी मंत्री सौरभ भारद्वाज यांच्या घरावर अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) छापेमारी केली. रुग्णालय बांधकामातील भ्रष्टाचाराच्या आरोपावरून ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत ईडीने आणखी १२ ठिकाणी छापे टाकले. दिल्लीच्या लाचलुचपत प्रतिबंधक शाखेने (एसीबी) मागील वर्षी आप सरकारच्या काळात आरोग्य पायाभूत सुविधांशी संबंधित प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याच्या आरोपांची चौकशी सुरू केली होती.

या प्रकरणात जून महिन्यात माजी आरोग्य मंत्री सौरभ भारद्वाज आणि सत्येंद्र जैन यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. यानंतर एसीबीने हे प्रकरण ईडीकडे वर्ग केले. केंद्रीय एजन्सीने जुलैमध्ये हा गुन्हा दाखल केला. दरम्यान, देशाचे लक्ष विचलित करण्यासाठी सौरभ यांच्या घरी ईडीचा छापा टाकण्यात आला आहे.

## विमुक्त-भटक्या समाजाच्या शैक्षणिक-आर्थिक संधींना गती

**मुंबई-** भटक्या-विमुक्त जाती-जमाती संवर्गातील लाभार्थ्यांना शैक्षणिक व आर्थिक संधींना गती मिळणार आहे. राज्य मंत्रिमंडळ बैठकीत विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातील लाभार्थ्यांना ओळखपत्रे, प्रमाणपत्रे आणि विविध शासकीय योजनांचा लाभ सोप्या पद्धतीने मिळवून देण्यासाठी कार्यपद्धती प्रभावीरित्या राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या निर्णयामुळे या समाजघटकांना शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक योजनांचा लाभ वेगाने मिळू शकेल. यासाठी ओळखपत्रे व प्रमाणपत्रांच्या वितरणाची प्रक्रिया पारदर्शक व सुटसुटीत करण्यात येणार आहे. तसेच शासकीय योजनांची माहिती स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देऊन लाभार्थ्यांना थेट मदत पोहोचवली जाणार आहे.

## शिक्षिकेने मुलीसह स्वत:ला पेटवले! हुंड्यासाठी छळ केल्याचा आरोप

■ जोधपूर

**राजस्थानच्या** जोधपूर येथील एका सरकारी शाळेतील शिक्षिका संजू बिश्नोई हिने ३ वर्षांच्या पोटच्या मुलीसह स्वतःला जाळून घेतले. यात मुलीचा जागीच मृत्यू झाला तर संजूचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांना सुसाईड नोट सापडली असून, पती आणि सासरच्या लोकांकडून हुंड्यासाठी छळ होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी संजूच्या वडिलांनी पोलीस तक्रार दाखल करून पीडितेच्या सासरच्यांवर हुंड्यासाठी छळ केल्याचा आरोप केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संजू २२ ऑगस्ट रोजी शाळेतून परतली. तिने स्वतःला घरात कोंडून घेतले. डायनिंग टेबलच्या खुर्चीवर पेट्रोल ओतले. स्वतः वर आणि मुलीवरही पेट्रोल टाकत पेटवून घेतले. दोघीही गंभीररित्या भाजल्या. यामध्ये चिमुकल्या यशस्वीचा जागीच मृत्यू झाला, तर संजूचा उपचारादरम्यान दुसऱ्या दिवशी मृत्यू झाला.

पीडितेच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १२ वर्षांपूर्वी संजूचे दिलीपसोबत लग्न झाले होते. त्यांनी हुंड्यात एक कार आणि इतर मौल्यवान वस्तू दिल्या होत्या. परंतु, तिला सतत छळ सहन करावा लागत होता. ४-५ महिन्यांपूर्वी तिचे सासरच्या लोकांशी भांडणही झाले होते. संजू २०२१ पासून सरकारी वरिष्ठ माध्यमिक शाळेत शिक्षिका म्हणून काम करत होती. घटनेदिवशी पतीने तिला सकाळी शाळेत सोडले आणि दुपारी १ वाजता तिला घेऊन आला. संध्याकाळी तिच्या आत्महत्येचे वृत्त समोर आले.

11वा स्मृतिदिन

भावपूर्ण



श्रद्धांजली

कै. सौ. सविता सुरेश पिल्ले

स्वर्गवास : गुरुवार २८.०८.२०१४

भावपूर्ण श्रद्धांजली...

शोकाकुल

गोविंद वाडी, अंधेरी (पूर्व), मुं - ९३.